Chapter-2

# प्रकरण - 2

## श्री सयाजी साहित्यमाला सुरू करण्यामागचा उद्देश

### अ) 19 व्या शतकातील ब्रिटिश राजवटीतील शिक्षण व ग्रंथविषयक धोरण

इंग्रजी अंमलानंतर महाराष्ट्राची जी जडणघडण झाली त्याचाच उल्लेख आपण अर्वाचीन महाराष्ट्र असा करतो. ब्रिटिश राजवटीमुळे साऱ्या भारतीय जीवनातच स्थित्यंतर घडून आले आणि त्याने एका अगदी वेगळ्या प्रकारच्या वाङ्मय निर्मितीला प्रेरणा दिली. म्हणूनच या राजवटी पासूनच्या पुढील कालखंडात निर्माण झालेल्या वाङ्मयाला 'अर्वाचीन वाङ्मयाचा कालखंड' असे संबोधण्यात येते.

इ.स. 1818 त पेशवाईचा अस्त झाला आणि तेव्हापासून इंग्रजी अंमल सुरू झाला. या देशात राजकीय स्थित्यंतर घडून आले, त्याचबरोबर प्रचंड मानसिक स्थित्यंतर घडून आले. इंग्रजांनी या देशात आपला एकछत्री अंमल स्थापित केला. राज्यकारभार करताना त्यांच्या वृत्तीतच एक अंतर्विरोध होता. त्यांच्या मायदेशी त्यांची निष्ठा लोकशाहीची होती आणि भारतावर राज्य करताना त्यांचे धोरण साम्राज्यवादी होते. भारतीय लोकांना शहाणे करायचे, या देशात भौतिक सुधारणा करायच्या, सुव्यवस्था व शांतता निर्माण करून, सर्वांनाच सुखी व समृद्ध जीवन जगता येण्यासारखी परिस्थिती निर्माण करायची म्हणून प्रत्येक क्षेत्रात इंग्रज राज्यकर्त्यांनी विवक्षित धोरण आखले. जीवन सुखी, सुव्यवस्थित आणि सुरक्षित होण्यासाठी नवी अर्थव्यवस्था त्यांनी निर्माण केली परंतु त्या अर्थव्यवस्थेतच या देशाचे आर्थिक शोषण होण्याची सोय होती. पाश्चात्य देशातील भौतिक विद्यांचे शिक्षण आणि ज्ञान देण्याची नवी व्यवस्था त्यांनी निर्माण केली, परंतु त्यातून स्वतंत्र प्रज्ञेचे शास्त्रज्ञ निर्माण होण्याची शक्यताच उत्पन्न होणार नाही याची काळजी राज्यकर्ते घेत होते. बुद्धिप्रामाण्य, व्यक्तिस्वातंत्र्य, उदारमतवाद, लोकशाहीची मूल्ये इत्यादींचा पुरस्कार करूनही भारतीय लोक कायमचे गुलामगिरीत राहण्यातच स्वारस्य कसे मानतील याची दक्षता राज्यकर्ते घेत होते.

पेशवाईचा अस्त होईपर्यंत महाराष्ट्रात मराठी भाषेच्या पद्धतशीर अभ्यासाच्या बाबतीत एक प्रकारची अनास्थाच दिसून येते. ठिकठिकाणच्या पाठशाळांत ब्राह्मण मुले संस्कृत भाषेचा अभ्यास करीत असत; पण सर्वसाधारणपणे जनतेमध्ये मराठी भाषेचा अभ्यास असा केला जात नव्हता. बहुजनसमाजाला शिक्षण देण्यासाठी शाळा उघडणे, सरकारी शिक्षण खाते संपन्न करणे हे नुसतेच आवश्यक असते असे नव्हे तर ती सरकारचीच जबाबदारी असते ही कल्पनाच पेशवाईपर्यंत नव्हती. व्यवहारापुरतें लिहिणें वाचणे व हिशेब ठेवणे या गोष्टी चालत असत. अशा मुलांच्या वाचनांत कांही हस्तलिखित बखरी व पोथ्या यांचा उपयोग होत असे. छापण्याची कला समोर असूनसुद्धा तिचा उपयोग ज्ञानप्रसारार्थ झाला नाही. नाना फडणवीस यांच्या प्रेरणेने सुरू झालेंले व मिरजेचे गंगाधरराव पटवर्धन यांनी पुरे केलेले भगवद्गीतेचे ठोकळा छाप मुद्रण (1805) एवढा एकच अपवाद नमूद करण्यासारखा आहे.

पेशवाईनंतर महाराष्ट्रात इंग्रजी राजवट सुरू झाली. स्वराज्य नष्ट करून परधर्मी राज्य स्थापण्याचें काम कठीण असतें. परकीय लोकांच्या हाती राज्य गेले की प्रजेची मने अगोदरच दुखावलेली असतात. तशात त्यांच्या रीतिभाती, भाषा व धर्म या संबंधाने परकी लोक अज्ञानी असल्यामुळे उत्तरोत्तर प्रजेचा असंतोष वाढत जातो. अशा प्रसंगी राज्यकर्त्यांच्या अंगी मुत्सद्देगिरी आणि अलौकिक चातुर्य असावे लागते. असे काही चतुर राज्यकर्ते पेशवाईच्या अंतकाळी महाराष्ट्रात होते. त्यां पैकी माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन (1818-1828) हा एक होय. तो धूर्त, धोरणी पण उदारमतवादी होता. त्याने परकीय राज्यकर्त्यांचा प्रतिनिधि म्हणून हरएक प्रकारे महाराष्ट्राचे मन जिंकून घेतले होते. मुंबई प्रांताचा गव्हर्नर होण्याच्या अगोदर दक्षिणेचा कमिशनर असतांनाच त्याने संपूर्ण प्रांताची पाहणी करून एक निवेदन तयार केले होते. माऊंट स्ट्युअर्ट एलफिन्स्टनने कंपनी सरकारचा प्रतिनिधी म्हणून ज्या वेळी मुंबई प्रांताचा कारभार हाती घेतला, त्यावेळी मराठी भाषेत व्यवहार करणारा फार मोठा भूभाग त्याच्या ताब्यात आला. मराठवाडा सोडला तरी, मराठी संस्थानांच्या रूपाने नागपूर, इंदोर, बडोदे, ग्वाल्हेर, झाशी हा मध्यभागातील सर्व टापू व मुंबई प्रांताचा सारा भाग (यात मुंबई कर्नाटकचाही समावेश होतो, तेथील कोर्ट कचेरीची भाषा त्यावेळी मराठी होती) या समाविष्ट होतो. त्यात त्याने महाराष्ट्राची इत्थंभूत माहिती सादर केली. त्यात

महाराष्ट्राची भौगोलिक माहिती, मराठ्यांचा इतिहास, महाराष्ट्रातील सारापद्धती, गुन्ह्यांचे वेगवेगळे प्रकार व त्यांचा बंदोबस्त करण्याची पद्धती इत्यादी तपशील होता. त्याचा निष्कर्ष थोडक्यात असा होता की, महाराष्ट्रातील लोकांचा नैतिक अध:पात झालेला आहे. लोकांची नैतिक पातळी उंचावण्यासाठी शिक्षण प्रसाराद्वारा प्रयत्न करणे आपले आद्य कर्तव्य आहे.

ही कर्तव्याची जाणीव लोककल्याणाच्या केवळ निर्भेळ हेतूने जन्माला आली होती असे नव्हे. त्यात एक प्रकारची राजकीय दूरदृष्टी होती. जिंकलेल्या प्रदेशात शांतता प्रस्थापित केल्याविना राज्यकारभार सुरळित चालणे अशक्य होईल याची त्याला कल्पना होती. राज्यकारभार सुरळित आणि सुव्यवस्थित चालावयाचा तर एतद्देशीयांच्या मनात राज्यकर्त्यांविषयी विश्वास निर्माण झाला पाहिजे, राज्यकर्त्यांविषयी एतद्देशीयांना आपलेपणा वाटला पाहिजे.राज्यकारभारत एतद्देशीय लोकांची मदत घेणे आवश्यक आहे, लोकांच्या हातात कधी ना कधी तरी सत्ता द्यावीच लागेल आणि त्यासाठी त्यांना आवश्यक शिक्षण दिले पाहिजे असेही त्याला वाटे. या सर्व गोष्टी केल्या नाहीत तर ज्वालामुखी प्रमाणे, लोकांच्या मनांतील असंतोषाचा स्फोट होऊन ते आपल्यावर उलटतील व आपणाला येथून जावे लागेल त्याची त्याला खात्री होती. तारीख 27 ऑक्टोबर 1822 रोजी, मद्रास प्रांताचा तत्कालिन गव्हर्नर सर टॉमस मन्रो याला लिहिलेल्या एका पत्रांत एल्फिन्स्टनने हे सर्व विचार व्यक्त केले आहेत. तो लिहितो," The System of government and education which we have already established must sometime or other work such a change on the people of this country, that it will be impossible to confine them to subordinate employments, and if we have not previously opened vents for their ambition and ability, we may expect an explosion which will overturn our government " [1]

ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभाराचे धोरण कंपनीच्या नियामक मंडळाच्या आदेशानुसार कंपनीला नवी सनद देताना ठरविले जात असे.ही सनद दर वीस वर्षांनी नव्याने दिली जाई. कंपनी सरकारच्या नियामक मंडळाने येथील प्रजेच्या शिक्षणाकडे लक्ष देण्यास प्रारंभ केला, तो 1813 मध्ये ईस्ट इंडिया कंपनीला सनद देतेवेळी. 1813-1833 व 1833-1853 पर्यंतच्या वीसवीस वर्षांच्या मध्यवर्ती कालखंडात कंपनी

सरकारचे शैक्षणिक धोरण बदलत गेले. या कंपनी सरकारच्या शैक्षणिक धोरणाचा इंग्रज राजवटीतील नव्या संस्कारांच्या घडणीत फार मोठा हात आहे. त्याचे परिणाम साऱ्या आधुनिक भारतावर झालेले आहेत.

कंपनी सरकारने कंपनीच्या नोकरांना येथील इतिहास, भाषा, चालीरीती वगैरे समजून देण्यासाठी इ.स. 1800 मध्ये 'फोर्ट वुइल्यम कॉलेज'ची स्थापना कलकत्याला केली होती; पण तिचा उद्देश मर्यादित होता. कंपनीचा जसजसा विस्तार होत गेला तसतसा येथील लोकांच्या शिक्षणाचा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला. राज्यकर्ते ह्या नात्याने येथील प्रजेच्या चालीरीती समजून घेणे त्यांना भाग पडू लागले. फौजदारी स्वरूपाचे कायदे सर्वत्र सारखे जरी असले तरी मुलकी स्वरूपाचे निवाडे त्या-त्या प्रातांच्या पूर्वापार रूढीप्रमाणे करण्याचे धोरण कंपनी सरकारने अवलंबिले. त्यामुळे निवाडे देताना हिंदू वा मुस्लिम दोन्ही जमातींतील कायदेकानून व ग्रंथ समजून घेणे, कंपनीच्या न्यायाधिकाऱ्यांना आवश्यक होऊ लागले. शिवाय ज्या समाजावर राज्य करायचे त्या समाजाचे स्वरूप, भाषा, वर्तनपद्धती सांगोपांग समजून घेण्यासाठी पौरस्त्य ग्रंथांच्या अभ्यासाची गरज राज्यकर्त्यांना वाटू लागली. या गरजेबरोबरच आणि जिज्ञासेमुळे काही पाश्चात्य विद्वानांनी संस्कृत, पर्शियन वगैरे भाषांचा अभ्यास सुरू केला. युरोपमधील विद्येच्या पुनरूज्जीवनाची (Renaissance) परंपरा घेऊन हे इंग्रज लोक इकडे आले होते. त्यांची ज्ञान लालसाही जबरदस्त होती. इ.स. 1780 मध्येच इंग्रजीत भाषांतरीत झालेल्या भगवद्गीतेसारख्या ग्रंथाला, वॉरन हेस्टिंग सारख्या राजकारणी माणसाने प्रस्तावना लिहिलेली आहे. व्यावहारिक गरज व ज्ञानलालसा या दोनही गोष्टींमुळे भारतीय भाषांतील प्राचीन ग्रंथाच्या अध्ययनाला उत्तेजन देण्याची आवश्यकता राज्यकर्त्यांना वाटू लागली. त्याच्या जोडीला येथील कच्च्या मालाचे उत्पादन वाढविण्यासाठी व मालाची वाहतूक जलद करण्यासाठी येथील वातावरणावर यांत्रिकीकरणाचेही थोडे संस्करण करणे जरूर होते. यामुळेच इ.स. 1813 साली कंपनीला नवी सनद देताना पौरस्त्य व पाश्चात्य या दोनही पद्धतींचे शिक्षण एतद्देशीयांना देण्यासाठी एक लाख रूपये खर्च केले पाहिजेत, अशी अट कंपनीच्या नियामक मंडळाने कंपनीवर लादली. पौरस्त्य वाङ्मयाचे पुनरूज्जीवन व सुधारणा करण्याचा प्रयत्न व्हावा, एतद्देशीय विद्वानांना उत्तेजन द्यावे, भौतिकशास्त्राचे ज्ञान देण्याची व्यवस्था व्हावी व ते ज्ञान घेण्यासाठी एतद्देशीयांना प्रवृत्त करावे अशा अपेक्षा

त्या सनदेत होत्या. या ठरावामागे परोपकाराचा हेतू होता, असे नव्हे, तर येथील लोकांचा भोळेपणा, आपापसांतील भांडणतंटे, धार्मिक वेडगळ समजुती या गोष्टींचा फायदा घेऊन मिळविलेले साम्राज्य टिकवावयाचे असेल तर, त्या नाहीशा केल्या पाहिजेत, कारण अज्ञानी जनतेवर त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन हुकूमत चालविणे प्रथम सोपे वाटले तरी ते पुढे कठीण जाईल या गोष्टीची कंपनीला जाणीव होती. म्हणूनच एतद्देशीयांना शिक्षण देण्याची आवश्यकता कंपनीला पटली.

या पार्श्वभूमीवर एल्फिन्स्टनच्या कारकीर्दीला प्रारंभ झाला. त्याचे शिक्षणविषयक उदार धोरण होते; एतद्देशीयांना न दुखवता आपला कार्यभाग साधणे हे एल्फिन्स्टनचे मुख्य धोरण होते. लोकांना खूष करण्यासाठी त्यांच्या धार्मिक बाबतीत मुळीच हात घालावयाचा नाही, कारण कायद्यापेक्षा धार्मिक बंधने त्यांना जास्त महत्त्वाची वाटतात ही गोष्ट तो पूर्णपणे जाणून होता. या बाबतीत तो म्हणतो, " It would be better to call the prejudices of the Hindoos to our aid in reforming them, and to control vices by the ties of religion, which are stronger than those of low. By maintaining and purifying their present tenets, at the same time that we enlighten their understanding . we shall bring them nearer to that standard of perfection at which we concur in desiring that they should arrive."[2]

इ.स. 1818 मध्ये तो मुंबईचा गव्हर्नर झाला. मुंबईत त्याने एक इंजिनियरिंग व एक वैद्यकिय अशी दोन महाविद्यालये स्थापन केली. तसेच पुण्याला एक हिंदू कॉलेज स्थापन केले. शिक्षणाविषयी प्रारंभी दोन महत्त्वाचे प्रश्न उद्‌भवले होते. याच देशातील जुन्या पौरस्त्य विद्यांचे- वेद, धर्मशास्त्र, ज्योतिषशास्त्र इ शिक्षण द्यायचे की नवीन पाश्चात्य विद्येचे शिक्षण द्यायचे ? त्याचप्रमाणे हे शिक्षण इंग्रजी भाषेतून द्यायचे की संस्कृत, फारशी किंवा देशी भाषेतून द्यायचे ?

प्रारंभीचे धोरण उदारमतवादी असल्यामुळे पाश्चात्य विद्यांचे शिक्षण एतद्देशीय भाषांतून द्यावयाचे असा निर्णय झाला आणि प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था करण्यात येऊन त्या त्या विद्यांचे शिक्षण त्या त्या भाषेत देण्याची सोय झाली. ब्रिटिशपूर्वकाळात महाराष्ट्रात सरकारी शिक्षणयंत्रणा नव्हती आणि ग्रंथप्रकाशनाचीही यंत्रणा नव्हती. महाराष्ट्रात मुद्रणकला आली तीही इंग्रजांच्या आगमनाबरोबर आली.

एल्फिन्स्टनच्या धोरणामुळे शालेय पुस्तक निर्मितीस प्रारंभ झाला. कारण ज्या प्रकारचे व ज्या विद्यांचे शिक्षण द्यायचे त्यासाठी पाठ्यपुस्तके आवश्यक होती. म्हणून त्याने पाठ्यपुस्तके करून घेण्यासाठी आणि इंग्रजी ग्रंथाच्या भाषांतरासाठी सरकारी भाषांतर खाते सुरु केले.

एल्फिन्स्टनची कारकीर्द दहा वर्षांचीच होती. (इ.स.1818-1828) परंतु तेवढ्या अवधीत त्याने महत्त्वाचे कार्य केले. त्याची कारकीर्द सुरु होण्यापूर्वी 'विद्योत्तेजक सभा' या नावाची खासगी संस्था इ. स. 1815 त स्थापन झाली होती. मुंबई इलाख्याच्या कक्षेत येणाऱ्या गरीब प्रजेच्या शिक्षणासाठी उत्तेजन देण्याच्या हेतूने ही संस्था स्थापन झाली होती. परंतु त्या संस्थेकडून म्हणण्यासारखे कार्य झाले नाही. गव्हर्नरपदी आल्यावर एल्फिन्स्टनने हा प्रश्न, म्हणजे जनतेला शिक्षण देण्याचा प्रश्न मोठ्या आस्थेने हाती घेतला. त्याच्याच प्रेरणेने इ. स. 1820 मध्ये 'नेटिव्ह स्कूल बुक ॲण्ड स्कूल सोसायटी' या नावाची संस्था बंगालमधील एज्युकेशन सोसायटीच्या धर्तीवर स्थापन झाली. सालिना 5000 पौंडाचे सरकारी साहाय्य त्या संस्थेला मिळाले. या संस्थेच्या मदतीनेच मुंबई इलाख्यात मराठी व इंग्रजी शाळा स्थापन झाल्या. ही संस्था खाजगी होती. तिलाच एलफिन्स्टनने हाताशी धरून तिच्या द्वारे देशी भाषांतून ग्रंथनिर्मिती करण्यासाठी 1820 मध्ये 'दी नेटिव्ह स्कूल ॲण्ड स्कूल बुक कमिटी' स्थापन केली. हिलाच पुढे इ.स. 1822 मध्ये 'दी बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन ॲड स्कुल बुक सोसायटी' हे नाव मिळाले. हिलाच 1827 मध्ये याच संस्थेचे 'दी एल्फिन्स्टन नेटिव्ह सोसायटी' हे नाव प्राप्त झाले. इ.स. 1837 मध्ये याच संस्थेचे नाव 'दी एल्फिन्स्टन नेटिव्ह एज्यूकेशन सोसायटी', असे नामकरण झाले व हिचेच इ.स. 1840 मध्ये 'बोर्ड ऑफ एज्युकेशन' मध्ये रूपांतरण झाले. इ.स. 1820-1840 पर्यंत मराठी वाङ्मयात ज्या नव्या घडामोडी झाल्या, त्या मुख्यतः या संस्थेमार्फतच. या घडामोडींना सरकारी व देशी अशा उभयपक्षीय विचारवंतांचे साह्य होते. मराठी व गुजराती वाङ्मयात 'भाषांतर-युगा' चे प्रवर्तन करणारी ही प्रमुख संस्था या दृष्टीने या संस्थांचे विशेष महत्त्व आहे. या संस्थेची उद्दिष्टे पुढिल प्रमाणे आहेत. यावरून एल्फिन्स्टनच्या उदार व व्यापक धोरणाची कल्पना येऊ शकते.

1. शाळांची संख्या वाढवावी आणि शाळांतून शिकविण्याची पद्धती सुधारावी.
2. शाळांना शालोपयोगी पुस्तके पुरवावी.

3. खालच्या प्रतीच्या लोकांना शिकण्यास उत्तेजन द्यावे.
4. युरोपीय शास्त्रे व उच्चप्रतीच्या विद्येतील सुधारणा ह्यांचा परिचय शालेय शिक्षणातून व्हावा.
5. नीतिशास्त्र आणि पदार्थविज्ञानशास्त्र यावर देशी भाषेत पुस्तके तयार करण्याची तजवीज व्हावी.
6. इंग्रजी ही अभियुक्त भाषा (Classical Language) म्हणून शिकविण्यासाठीही शाळा स्थापन व्हाव्यात.
7. या ज्या ज्ञानाच्या शाखा शेवटी सांगितल्या, त्यांचा व्यासंग करण्याच्या कामी देशी लोकांना प्रोत्साहन द्यावे.

शैक्षणिक क्षेत्रातील एकंदर उद्दिष्टे लक्षात घेता, ती साध्य करण्याच्या मार्गात अनेक अडचणी होत्या. ब्रिटिशपूर्व राजवटीत अशा प्रकारच्या शिक्षणाला अनुकूल असे वातावरणच निर्माण झालेले नव्हते. येथे नव्या पद्धतीच्या शैक्षणिक गरजा भागविण्यासाठी योग्य ग्रंथ उपलब्ध नव्हते. सर्वसामान्य माणसात वाचनाची अभिरुची नव्हती, शिकण्याची हौस नव्हती. नवे ग्रंथ देशी भाषांतून तयार करण्यास कसलेले ग्रंथकार नव्हते. ते ग्रंथ छापण्यासाठी मुद्रणालये नव्हती. देशी ग्रंथ छापण्यास लागणारे खिळे (Types) इंग्लंडहून मागवावे लागत. तसे करण्यास लागणारी दळणवळणाची साधनेही उपलब्ध नव्हती. छापील ग्रंथ हातात धरणे म्हणजे भ्रष्टाचार अशी जाणत्या लोकांचीही समजूत होती. नवे शिक्षण म्हणजे धर्मांतराची पहिली पायरी अशीही अकारण भीती लोकांच्या मनात वावरत होती. नवे पाश्चात्य ज्ञान देशी भाषांतून अनुवादित करावयाचे तर त्याला योग्य परिभाषा तयार नव्हती. पद्यवाङ्मयनिर्मितीच्या दृष्टीने विचार करता मराठी भाषेच्या व्याकरणाचे नीट व्यवस्थापनही या आधी कधी झालेले नव्हते आणि मराठी भाषा म्हणजे एक साधी बोलभाषा (merely a spoken language) अशी एलफिन्स्टन, कॅनेडी, मोलस्वर्थ वगैरे या क्षेत्रातील कार्यकर्त्यांची समजूत झालेली होती. यामुळे मराठी नवगद्याची निर्मिती करताना अगदी पायापासून राज्यकर्त्यांना तयारी करावी लागली. कोश, व्याकरणे इत्यादिंच्या निर्मितीवर विशेष भर द्यावा लागला. लेखनशैली सुबोध ठेवण्यासाठी सूचना द्यावी लागली. परिभाषा घडवावी लागली. लोकांत वाचनाभिरुची निर्माण करण्यासाठी ग्रंथ छापून फुकट वाटावे लागले. नव्या अभिरुचीचा वाचकवर्ग तयार करावा लागला. त्यांच्या मनातील नव्या उपक्रमांबद्दलचा पूर्वग्रह दूर करण्यासाठी विदुरनीति, इसापनीति, पंचोपाख्यान,

सिंहासनबत्तीशी यांसारखी सोपी रंजक व भारतीय वातावरण असलेली पुस्तकेच प्रथम छापावी लागली. भाषांतरित व स्वतंत्र अशा नवग्रंथनिर्मितीसाठी परकेपणा घालवून ती भाषांतरे शब्दशः न करता इकडील वातावरणाशी जुळती-मिळती करुन घ्यावी लागली, सुबोधपणा आणण्याचा आवर्जून प्रयत्न करावा लागला. भाषेची अडचण ज्यात कमीत कमी येईल, अशीच गणित विषयासारखी शास्त्रीय पुस्तके प्रथमतः भाषांतरास घ्यावी लागली. शैली जुन्या पद्धतीची-गुरुशिष्यसंवादात्मक, क्वचित पत्रात्मक ठेवावी लागली. पद्याचाही आश्रय अधूनमधून घ्यावा लागला आणि तांत्रिक परिभाषेच्या अभावी, बोलीभाषेचा वापर करावा लागला. शंभर ते चारशे रूपयांपासून प्रसंगी पाच हजार रू. पर्यंतची बक्षिसे द्यावी लागली.

या कार्यासाठी (ग्रंथाचे लेखन, प्रकाशन, प्रोत्साहन, पुरस्कार) इ.स. 1825-1832 पर्यंत दी बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन स्कूल बुक सोसायटीचे दोन लाखांहून अधिक रुपये खर्च झाले. देशी भाषेच्या इतिहासात राज्यकर्ते व विचारवंत यांनी एकत्र येऊन एवढा संघटित प्रयत्न करण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. एकंदर अडचणी लक्षात घेता, अल्पावधीतच जी पायाभरणी झाली ती संघटनाकुशल, धोरणी, विज्ञानसंपन्न राजवटी शिवाय होऊ शकली नसली. एलूफिन्स्टन, मोल्सवर्थ, कॅण्डी, जर्विस इ. चे या क्षेत्रांत केलेले कार्य फार मोलाचे आहे.

आशयदृष्टया या ग्रंथांचा विचार केल्यास, लोकांच्या धार्मिक भावना दुखावल्या जाणार नाहीत अशा नैतिक बोधाचा पुरस्कार करणाऱ्या, मनोरंजन करणाऱ्या, व विज्ञानाचा प्राथमिक स्वरूपाचा परिचय करून देणाऱ्या ग्रंथावर भर देण्याचे धोरण राज्यकर्त्यांनी अवलंबिलेले दिसते. सुभाषितें, नीतिकथा, पशुपक्ष्यांच्या कथा लिहून घेण्याच्या भूमिकेतूनच पंचतंत्र, बाळमित्र, हितोपदेश, पंचोपाख्यान, विदुरनीति, इ. रचना झाली. भाषेचे ज्ञान व्हावे हा हेतू या मागे होता. या प्रकारच्या लेखनात अग्रगण्य ठरलेले लेखक म्हणजे बापू छत्रे व हरि केशवजी हे होते. सरकारचे शैक्षणिक धोरण सांभाळून मराठीत इंग्रजी ग्रंथांचा सुबोध अनुवाद करणारा लेखक म्हणून बापू छत्रे यांचा मान होता. (1788-1834). त्यांना 'अर्वाचीन मराठीचे जनक' मानण्यात येते. सरकारच्या भाषांतर विषयक धोरणास त्यांनी मोठे साहाय्य केले. तसेच भाऊ महाजन व बाळशास्त्री जांभेकर या दोन लेखकांना त्यांनी उत्तेजन दिले. हरि केशवजी (1804-

1858) यांचे ग्रंथलेखन मुख्यत:शास्त्रीय विषयांचे आहे. इसापनीति व पंचोपाख्यान यांची भाषांतरे त्यांनी केली खरी, पण मुख्यत: विज्ञान विषयक ग्रंथांच्या भाषांतराला त्यांची फार मदत झाली.

पाश्चात्य विज्ञानकल्पनांचा देशी भाषांतून प्रचार करण्याच्या दृष्टिकोणालाच तत्कालीन शिक्षण पद्धतीत प्राधान्य होते. या बरोबरच शांतताप्रिय इंग्रजी राजवटीशी एकनिष्ठ राहणारे, निर्व्यसनी, साधेपणा, नियमितपणा व शिस्त यांची आवड असलेले एक नवे नागरिकत्व घडविणे, हे ही शिक्षणाचे उद्दिष्ट होते. या उद्दिष्टाला पूरक असेच साऱ्या ग्रंथनिर्मिती मागचे धोरण होते. या प्रथमावस्थेत वाङ्मयाला शालेय, सामान्य, भाषांतरित, प्राथमिक स्वरूपाचे, बालबोध, परप्रत्ययनेय, हुकमेहुकूम पद्धतीने तयार झालेले, रसरूप गंध नसलेले इ. विशेषणे लावली जातात. परंतु तत्कालीन परिस्थितीतील दुर्लघ्य अडचणी लक्षात घेतल्या, तरच या वाङ्मयाचे मूल्य पटू शकेल. श्रद्धायुगातून  विज्ञानयुगात प्रवेश होताना, नव्या ज्ञानकल्पनांनी भारावून जाऊन ते शक्य तितके आत्मसात करण्याची उत्कट तळमळ तत्कालीन पिढीतील जाणत्यांना लागलेली होती. 'ज्ञान हाच पराक्रम' असे उद्‌गार लोकहितवादींच्या शतपत्रांत आढळतो.

या नव्या शिक्षणाच्या प्रथमावस्थेचा वाङ्मयीन दृष्टया विचार करता असे दिसते की, या नव्या शिक्षणाने इंग्रजीसारख्या समृद्ध भाषेशी आपली ओळख करून दिली. आशय व अभिव्यक्ती यांचे काही प्रकार नव्यानेच आपल्यासमोर आणले; अनेक ज्ञानशाखांशी परिचय करून दिला, भाषेची उभारणी एका स्थिर पायावर केली. तिला एक नवे सांस्कृतिक मूल्य प्राप्त करून दिले. साऱ्याच गोष्टींकडे बुद्धिनिष्ठ चिकित्सेने पाहण्याची नवी दृष्टी आणली. स्वभाषेची वैगुण्ये दूर करण्यासाठी पद्धतशीरपणे व संघटितरीत्या कसे प्रयत्न करता येतील, याची दिशाही दाखविली. जातिनिरपेक्ष ऐहिक भूमिकेवरून विचार करणारा एक नवा वाचकवर्ग व ज्ञानप्रसाराची नवी साधने उपलब्ध करुन दिली. ज्ञानाचे वितरण करणारे नवे ग्रंथकार पुढे आणले.

अव्वल इंग्रजीतील पहिल्या पाच पन्नास वर्षांचा काळ लक्षात घेतला तर असे दिसून येतेकी, या ज्ञानलालसेमुळे व तत्कालीन गरजेप्रमाणे एकेक ग्रंथकार मूलत:च एकमेकांपासून भिन्न असलेल्या ज्ञानक्षेत्रात तेवढ्याच उमेदीने प्रवेश करी.

यालाच 'पुणेरीवळण' असे नाव दिले गेले. मराठी वाङ्मयाचा केंद्रबिंदू जो अव्वल इंग्रजीत मुंबई हा होता, तो पुणे बनला व पुढे तो न्या. रानडे, विष्णुशास्त्री चिपळूणकर, लो. टिळक, आगरकर, हरिभाऊ आपटे, वगैरेंच्या पुण्यातील वास्तव्याने व कर्तृत्वाने तेथेच स्थिर झाला.

हे पुणेरी वळण लावण्यास कृष्णशास्त्री चिपळूणकर, कृष्णशास्त्री राजवाडे, महादेवशास्त्री कोल्हटकर, विष्णुशास्त्री पंडित इ. साहय झाले. इंग्रजीच्या अध्यायनाने आलेल्या नव्या दृष्टीचा, जुन्या संस्कृताशी मेळ घालण्याची कामगिरी मुख्यत: या मंडळींनी केली.

''विदग्ध संस्कृत साहित्याची काव्यनाटकांची भाषांतरे या विद्वान मंडळीनी मराठीत केली व जुने ललित वाङ्मय सर्वसाधारण माणसाला प्रथमच उपलब्ध करून दिले. पुणे पाठशाळेला इंग्रजीचा वर्ग जोडल्यानंतर इंग्रजी भाषेतील ज्ञान देशी भाषांतून रूपांतरित करण्याचेही एक उद्दिष्ट राज्यकर्त्यांसमोर होते. या भाषांतर रूपांतरांच्या कामासाठी संस्कृतचे साह्य शक्य तितके घेण्याचे धोरण अंगिकारल्यानेही मराठी भाषेला संस्कृत प्रचुर वळण लागले असावे.'' [3] हे वळण लावण्यात पुणे पाठशाळेचा प्रमुख मेजर कँडी याचा फार मोठा वाटा आहे. मेजर कँडी हा 1837 पासून पुणे पाठशाळेचा प्रमुख होता. त्याने सुमारे तीस बत्तीस वर्षे मराठीची सेवा केली. मराठी भाषेच्या आधुनिक ग्रांथिक शैलीवर याच्या इतकी, विदेशीच काय, पण इतर कोणत्याही देशी पंडिताची वा ग्रंथकाराची छाप नाही. शाळा खात्याशी व दक्षिणा प्राइझ कमिटीसारख्या संस्थांशी मे. कँडींचा अधिकारी या नात्याने संबंध आला होता. ग्रंथपरीक्षण, मुद्रणालय व भाषांतर या खात्यांचाही तो प्रमुख होता. कोशरचना व व्याकरण तयार करण्याच्या कामात त्याचा हात होता. पाठ्यपुस्तके तयार करून घेणे, ग्रंथांच्या नवीन आवृत्त्या तयार करणे इ. कामे ही सरकारने त्यांच्याकडेच सोपविली होती. वाङ्मयाचा आशय व त्याची अभिव्यक्ती या बाबतीत निर्णायक मत देणारा प्रमुख सरकारी अधिकारी कँडीच होता. वाक्यरचना, प्रयोग, शब्दांची रूपे, यावर त्याचे बारीक लक्ष असे. ग्रंथकारांना ग्रंथसुधारणेच्या बाबतीत अनेक तपशीलवार सूचना तो देई. मराठी वाक्यरचनेतील शैथिल्य व अनियमितपणा काढून टाकून भाषेला बंदिस्तपणा आणला, तो मेजर कँडीनेच. मराठी भाषेच्या लेखनात विरामचिन्हे वापरण्याची पद्धतीही त्यानेच सुरु केली. मनोरंजनात्मक ग्रंथांपेक्षा बोधप्रचुर वाङ्मयनिर्मितीकडे त्याचा

अधिक कल होता. वाङ्मयीन सौंदर्यापेक्षा सुबोध, व्यावहारिक माहितीपर धडे वाचनपाठमालेत घालण्याकडे त्याची प्रवृत्ती होती.

"मेजर कँडीने मराठी भाषेच्या गद्यशैलीकडे लक्ष पुरविण्यापूर्वी मराठी भाषेत सामान्यत: चार प्रकारची वळणे रूढ झाली होती.

1. गृहस्थी वळण या नावाने प्रसिध्दी पावलेले जुने पेशवाई वळण.
2. शास्त्रीवळण किंवा संस्कृती वळण.
3. इंग्रजी किंवा भाषांतरी वळण.
4. संमिश्र वळण, संस्कृत भाषा, संस्कृत साहित्य, भारतीय इतिहास परंपरा इ एक वेगळे महत्व या काळात आले." [4]

इंग्रज सरकारच्या या प्रथमावस्थेतील (1813-1833) शैक्षणिक धोरणात पौरस्त्य व पाश्चात्य विद्या यांची सरमिसळ आढळते त्याला काही कारणे होती. एका बाजूने जुन्याला खूष करण्याचा, तर दुसऱ्या बाजूने नव्याचा परिचय करून देण्याचा इरादा त्यात दिसतो. मात्र हे फार मर्यादित प्रमाणात करण्याचे धोरणही स्पष्ट होते. पौरस्त्यांवर पाश्चात्य विद्यांचे संस्करण फार मोठ्या प्रमाणात होऊ नये, अशी या राज्यकर्त्यांपैकी एका गटाची भूमिका होती. इंग्रजांच्या तडाख्यातून अमेरिका देश नुकताच स्वतंत्र झाला होता. भारत जर कायमचा, निदान दीर्घकाळ, इंग्रजांच्या ताब्यात राहावयास हवा असेल तर भारतीय व इंग्रज यांच्यामधील सांस्कृतिक अंतर कायम राखणे आवश्यक आहे, पौरस्त्य लोक पाश्चात्य विद्या व कला यांत पारंगत झाल्यास हे अंतर नष्ट होईल व पर्यायाने स्वत:चे येथील राज्य धोक्यात येईल, अशी भीती राज्यकर्त्या वर्गातील एका गटाला वाटत होती. ले. ब्रिग्ज नामक एक लष्करी अधिकारी माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनच्या भेटीस गेला असता, त्यांच्या तंबूच्या एका कोपऱ्यात नवीनच छापलेल्या मराठी पुस्तकांचा ढीग दिसला. या प्रसंगाचे वर्णन करताना ब्रिग्ज म्हणतो "On my observing in the corner of his tent one day a pile of printed Mahratta Books, I asked him what they were meant for ? To educate the natives said he; 'but it is our high road back to

Europe,' 'Then I replied, 'I wonder, you, as Governer of Bombay, have set it on Foot.' He answered, " We are bound under all circumstances, to do our duty to them" [5] हा धोका पत्करूनही नवे शिक्षण द्यावे, असे म्हणणारी एल्फिन्स्टन सारखी काही मंडळी होती. पाश्चात्य शिक्षणाचा आवर्जून पुरस्कार करणाऱ्या लोकांनीही साऱ्या नव्या ज्ञानविज्ञानात भारतीयांना पारंगत करण्याची भूमिका कधी घेतली नव्हती, आणि पुढेही केव्हा राज्यकर्त्यांनी त्या दृष्टीने येथील जनतेला स्वयंपूर्ण होण्यास उत्तेजन दिलेले नाही. त्यामुळे नवविद्या संपादन करणाऱ्या व्यक्तींच्या नव्या क्षेत्रातील वाङ्मय (Literature), समाजशास्त्र (Social Science) वा तत्त्वज्ञान (Metephysics) यांच्याशी जेवढा परिचय झाला तेवढा भौतिक शास्त्रांशी (Material Sciences) झाला नाही. या क्षेत्रातील एतद्देशीयांचे एतद्‌विषयक ज्ञान, इच्छा असूनही सामान्य पातळी ओलांडून पुढे जाऊ शकले नाही. ज्या विज्ञानपरिचयाचा भारतीय जीवनात प्रभाव पडला तो सामाजिक, धार्मिक क्षेत्रांत बुद्धिनिष्ठ दृष्टिकोन निर्माण होऊन श्रद्धायुगाचा लोप होण्यापुरताच. पौरस्त्य व पाश्चात्य दोन्ही प्रकारच्या शिक्षणाला उत्तेजन देण्याच्या व पाश्चात्य विद्यांचे ज्ञान देशी भाषांतून निर्माण करण्याच्या ईस्ट इंडिया कंपनीच्या धोरणाला अनुसरून एल्फिन्स्टनने मुंबई प्रांतातील शैक्षणिक योजना आखली होती. स्थानिक परिस्थितीप्रमाणे या दोन प्रकारच्या शिक्षणाचे विभाजन करून पौरस्त्य विद्यांचे अध्ययन पुण्यास, व पाश्चात्य शिक्षण मुंबईस सुरू करण्याची त्याने योजना केली.

एल्फिन्स्टनने ज्या काही चांगल्या गोष्टी केल्या त्यांपैकी सांस्कृतिकदृष्ट्या एक घटना अतिशय अन्वर्थक आहे. पेशवाईच्या उत्तरकाळात ब्राह्मणांना दक्षिणा वाटण्याची पद्धत होती. हा सर्व खर्च अनाठायी आहे असे एल्फिन्स्टनला वाटले. परंतु ही पद्धत एकदम बंद करणे म्हणजे एतद्देशीय लोकांचा आणि विशेषत: ब्राह्मणांचा राग ओढवून घ्यावा लागला असता, म्हणून दानासाठी असलेल्या एक लाख रकमेपैकी काही रक्कम खर्च करून, संस्कृत भाषेच्या अभ्यासाला चालना मिळावी म्हणून एल्फिन्स्टनने पुणे पाठशाळा म्हणजेच हिंदू कॉलेज स्थापन स्थापन केले. सुरवातीस त्या पाठशाळेत सुमारे शंभर विद्यार्थी होते. प्रत्येकाला दरमहा पाच रूपये शिष्यवृत्ती देण्याचीही व्यवस्था होती. धर्म, न्याय, ज्योतिष, व्याकरण इ. अभ्यास संस्कृत मधून होत असे.

हे हिंदू कॉलेज बंद करावे असे पुष्कळ अधिकाऱ्यांचे त्यावेळी मत होते. अशा विषयांच्या अभ्यासामुळे समाजातील जुन्या धार्मिक वेडगळ समजूती दृढ होतील असे त्यांना वाटत होते. शिवाय ज्या पाश्चात्य भौतिकशास्त्रांचा नवा दृष्टिकोन एतद्देशीयांना द्यावयाचा, त्या साठी हे हिंदू कॉलेज उपयोगी नाही असे त्यांचे मत होते. परंतु एल्फिन्स्टनचा ह्या संबंधी हेतू निश्चित होता. संस्था पूर्णपणे बंद न करता कालांतराने त्यात यथायोग्य फरक करून घेणे अशी त्याची भूमिका होती. कालांतराने पाठशाळेला इंग्रजीचा वर्ग जोडावा. संस्कृत बरोबरच मराठीचाही वर्ग चालवावा आणि यथाकाळ भाषांतरकार तयार करण्याचे काम सुरू करावे अशी त्याची योजना होती. त्याच्या कारकीर्दीत जरी नाही तरी नंतरच्या काळात या योजना अंमलात आल्या.

इंग्रज राज्यकर्त्यांनी पौरस्त्य विद्याभ्यासाची परंपरा चालू ठेवली, एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील प्रबोधनाच्या आणि वैचारिक उत्क्रांतिच्या प्रक्रियेत या परंपरेतील काही वैशिष्ट्यांचे पुनरूज्जीवन झाले.

इ.स. 1828 मध्ये एल्फिन्स्टनच्या जागी गव्हर्नर म्हणून मालकम यांची नेमणूक झाली. त्यानेही एल्फिन्स्टनचे धोरण पुढे चालू ठेवले. शिक्षणोपयोगी ग्रंथप्रकाशनाला सरकारी प्रेरणा व मदत चालू ठेवली. नंतरच्या पाच दहा वर्षात परिस्थिती पालटू लागली. एतद्देशीय भाषांना उत्तेजन देण्याच्या प्रवृत्तीला विरोध होऊ लागला. असा विरोध करण्यात आंग्ल पंडित मेकॉले हा अग्रगण्य होता. इ.स. 1932 मध्ये मेकॉलेने एक निबंध वाचला आणि बंगालच्या गव्हर्नर पुढे एक विस्तृत वृतान्तही सादर केला, त्यात त्याने उघड उघड इंग्रजी भाषेची व इंग्रजी विद्येची प्रशंसा केली आणि एतद्देशीय भाषेची व पौरस्त्य विद्यांची, नालस्ती केली. मेकॉलेने स्पष्ट शब्दात आपले मत ठामपणे व्यक्त केले की, एतद्देशीयांना पाश्चात्य भौतिक शास्त्रांचेच शिक्षण दिले पाहिजे. इतकेच नव्हे तर चालू असलेल्या शिक्षण संस्था बंद करून पाश्चात्य शिक्षण देणाऱ्या संस्थाच स्थापन कराव्यात.

मेकॉलेच्या मताची अंमलबजावणी प्रथम बंगालमध्ये झाली. मुंबई इलाख्यात मात्र हे धोरण तातडीने अंमलात आले नाही. एल्फिन्स्टनच्या प्रेरणेने एतद्देशीयांना, एतद्देशीय भाषेतून शिक्षण देण्यासाठी ज्या अनेक संस्था निर्माण झाल्या त्यात 'मुंबई-शिक्षा मंडळी' (बॉम्बे एज्युकेशन सोसायटी) अथवा मुंबईची हैंद शाळा व शाळापुस्तक मंडळी (बॉम्बे स्कूल ॲण्ड स्कूलबुक्स सोसायटी) ही इ.स.1823 च्या सुमारास

स्थापना झालेली संस्था उल्लेखनीय आहे. कॅप्टन जॉर्ज रिस्टो जर्विस (इ.स.1794-1851) हे या संस्थेचे पहिले युरोपियन चिटणीस होते. त्याने विज्ञानविषयक ग्रंथनिर्मितीस फार मोठे साह्य केले. मुंबई प्रांतातील वैज्ञानिक शिक्षणाचा पाया यानेच घातला, असे म्हणावयास हरकत नाही. स्थापत्यशास्त्र शिकविण्यासाठी त्याने 1825 मध्ये एक शाळा काढली. गणित, ज्योतिष, पदार्थविज्ञानशास्त्र, भूगोल यांतील प्राथमिक तत्वांचा परिचय करून देणारी अनेक पुस्तके याने तयार करवून घेतली. हरि केशवजी हे याच्या हाताखालीच इंजीनिअरींग शाळेत नोकरीला असल्यामुळे साहजिकच विज्ञानविषयक ग्रंथनिर्मितीशी त्यांचा अधिक संबंध आला. वाङ्मय (Literature), कला (Art), विज्ञान (Science) असे जे शब्द या काळात वापरले जातात, त्यांचा अर्धवाङ्मय म्हणजे नीतिबोधपर कथा, कला म्हणजे प्राथमिक स्वरूपाची कारागिरी व विज्ञान म्हणजे निसर्गविषयक ज्ञानाचा स्थूल परिचय असा, सर्वसाधारणपणे मानावयास हरकत नाही. त्यांनी एल्फिन्स्टनच्या ज्ञानप्रसाराचे उदार धोरण अंमलात आणले. जर्विसने एतद्देशीयांची मने जिंकून घेतली शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असावे की मराठी असावे या वादात जर्विसने मराठी माध्यमाचीच भूमिका घेतली. या देशात ज्ञानप्रसार व्हावा, सर्वांनाच उच्च शिक्षण मिळावे या हेतूने त्याने पुढाकार घेऊन पैसे जमविले आणि त्यातूनच एल्फिन्स्टनच्या स्मरणार्थ इ.स. 1835 त एल्फिन्स्टन कॉलेज सुरु केले.

मुंबईत मेकॉलेच्या मताची अंमलबजावणी त्वरित झाली नाही. मराठी भाषा व मराठी भाषेतून सरकारी प्रेरणेने ग्रंथनिर्मिती या गोष्टींना इ.स. 1854 पर्यंत मुंबई इलाख्यातील सरकारी अधिकाऱ्यांनी महत्व दिले. त्यानंतर चार-पाच वर्षांतच राज्यकर्त्यांचे धोरण बदलले. खाजगी अथवा निमसरकारी संस्थांना साह्य करण्याऐवजी सरकारी शिक्षण खाते स्थापन झाले. इ.स. 1857 मध्ये मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात एक विषय म्हणून दोन तीन वर्षे मराठीचा समावेश होता, पण नंतर दुय्यम विषय म्हणूनही मराठीला विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात स्थान राहिले नाही.

इ.स. 1840 मध्ये शिक्षणाची व्यवस्था पाहण्यासाठी 'बोर्ड ऑफ एज्युकेशन' होते. त्यावेळी सुद्धा शिक्षणाच्या माध्यमाचा वाद होताच. बोर्डाचे अध्यक्ष सर. ई. पेरी हे इंग्रजीचे अभिमानी होते. तर चिटणीस जर्विस हे मराठी भाषेचे अभिमानी होते. तसेच इंग्रजी ग्रंथांचे मराठी भाषांतर करण्याचे व इंजिनियरींग

कॉलेजातही मराठीचा वर्ग यशस्वीपणे चालविण्याचे श्रेय त्यांच्याकडे होते. बोर्डाच्या सभासदांमध्येच ह्या विवादाविषयी ऐक्य नव्हते. हा वाद शेवटी इ.स. 1848 त मुंबईच्या गव्हर्नर पुढे मांडण्यात आला त्यांनी देशी भाषेचे समर्थनच केले. प्रत्येक माणसाला आपली देशी भाषा प्रथमपासूनच परिचित असते त्यामुळे त्याच्या मातृभाषेतून शिक्षण देणे योग्य व सोयीचे असते.शिक्षणाचे माध्यम देशी भाषाच असावे असे मत गव्हर्नर यांनी व्यक्त केले. मात्र त्याबरोबर हे ही स्पष्ट केले की, ज्ञानाच्या उच्च शाखांचा अभ्यास इंग्रजीत करण्याची साधने उपलब्ध करून द्यावीत. इ.स. 1854 पर्यंत हे धोरण होते परंतु याच वर्षी कोर्ट ऑफ डायरेक्टरच्या आदेशानुसार हिंदुस्थानचे सर्व शिक्षणविषयक धोरणच एकसूत्री करण्यात आले.

प्राथमिक माध्यमिक आणि उच्च असे शिक्षणाचे तीन वर्ग करण्यात आले. आणि प्रत्येक प्रांतात शिक्षणाच्या व्यवस्थेसाठी सरकारी खाते स्थापन करण्यात आले. उच्च शिक्षणासाठी विश्वविद्यालयाची किंवा विद्यापीठाची स्थापना करण्याची शिफारस करण्यात आली. आणि युरोपातील भौतिक ज्ञानाचा, भौतिक विद्यांचा आणि भौतिक शास्त्रांचा प्रसार समाजाच्या सर्व स्तरावर व्हावा, हे उद्दिष्ट यामागे होते.

इ.स. 1857 च्या कायद्यान्वये मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. नवीन शाळा, हायस्कूले आणि कॉलेज उघडण्यात आली व विद्यापीठांशी संलग्न करण्यात आली. हायस्कूल आणि कॉलेज यात इंग्रजी माध्यम आणि प्राथमिक शाळेत फक्त मराठी माध्यम असे धोरण होते. दोन-तीन वर्षे मराठी दुय्यम विषय होता. वामन आबाजी मोडक, न्या. रानडे, या मंडळींनी बी.ए ला मराठी विषय घेतला होता त्यानंतर दुय्यम भाषा म्हणून मराठीचे उच्चाटण झाले.

पुणे पाठशाळा अर्थात हिंदु कॉलेजमध्ये प्रारंभी सर्व अभ्यास संस्कृतमधून होत असे कालांतराने इंग्रजी व मराठी भाषांचे वर्ग त्याला जोडण्यात आले. कृष्णशास्त्री चिपळूणकर, नानाशास्त्री आपटे, महादेव गोविंदशास्त्री कोल्हटकर, कृष्णशास्त्री राजवाडे इ. नामवंत मंडळी याच पाठशाळेत होती.

शिक्षणविषयक धोरणात बदल होत गेले आणि इ.स. 1857 नंतर या धोरणाला एक प्रकारची निश्चिती आली. या सर्व शिक्षणोपक्रमांचा सांस्कृतिक व वाङ्मयीन परिणाम काय झाला, त्याचे स्वरूप काय होते हे या संदर्भात बघण्यासारखे आहे.

1. नव-शिक्षितांच्या पिढ्यातच स्वरूप भिन्नता जाणवायला लागली. काही मंडळी एल्फिन्स्टनच्या काळात स्थापन झालेल्या शिक्षणसंस्थांतून नवशिक्षण घेऊन बाहेर पडली. काही मंडळी पुणे पाठशाळेतून बाहेर पडली. या मंडळींनी प्रामुख्याने पौरस्त्य विद्यांचा अभ्यास (धर्मशास्त्र, वेदशास्त्र, न्यायशास्त्र, अलंकार, व्याकरण) संस्कृत भाषेतूनच केला. मराठीचा व इंग्रजी भाषांचा अभ्यास त्यांनी नंतर केला. विद्यापीठ स्थापन झाल्यावर पदवीधरांची जी पहिली पिढी बाहेर आली तिने मराठीचा दुय्यम विषय म्हणून अभ्यास केला होता आणि त्यानंतर येणारी मंडळी ही तर केवळ आंग्लविद्याविभूषित अशी होती. त्यामुळे नव्या संस्कृतीच्या जडणघडणीच्या काळात नवशिक्षित समाजात विभिन्न मनोवृत्ती जोपासल्या गेल्या.

2. शिक्षणाचा प्रचार व प्रसार समाजाच्या सर्व स्तरांवर व्हावा या हेतूनेच सरकारतर्फे उपक्रम होत होता. आणि त्या उपक्रमातूनच ग्रंथनिर्मितीची प्रेरणा मिळाली होती. शालोपयोगी ग्रंथ व इतर ग्रंथ सरकारच तयार करी. खाजगी ग्रंथनिर्मितीचे जे प्रयत्न होत त्यांनाही सरकारकडून आर्थिक सहाय्य मिळत असे. बहुतांशी ग्रंथ तयार करवून घेतले जात. उदा. 'मुंबईच्या हैंदशाळा-शाळापुस्तक मंडळीने' मराठीत भाषांतरित किंवा स्वतंत्र ग्रंथ लिहवून घेतले. ते लिहिणाऱ्या उदयोन्मुख लेखकांना उत्तेजन म्हणून बक्षिसेही दिली. शक्यतो देशी शब्द वापरावे, देशी शब्द उपलब्धच नसतील तर मग सुटसुटीत असा संस्कृत किंवा फारशी शब्द वापरावा आणि शेवटी अगदीच जरुर पडली तर इंग्रजी शब्द वापरावा. अशा प्रकारच्या सूचनांमागे निश्चित स्वरुपाची भाषिक जाणीव होती. या देशात इंग्रजांची राजवट येण्यापूर्वी दीर्घकाळपर्यंत मोगलांचे, यवनांचे राज्य होते. त्यामुळे संस्कृत बरोबरच फारशी शब्द मराठी भाषेत रुळलेले होते. तेव्हा शक्यतो लोकांना परिचित अशा भाषेत ग्रंथ लिहिला जावा, हा हेतू अशा सूचनांमागे होता.

इ.स. 1851 मध्ये पुणे येथे 'दक्षिणा प्रैज कमिटी' स्थापन झाली. या द्रव्याचा विनियोग मराठी ग्रंथलेखनाला उत्तेजन देण्याकडे व कॉलेजात 'फेलो' नेमण्याकडे करावा असे ठरले. अशा संस्थांच्या प्रोत्साहनाने ग्रंथकार निर्माण होऊ लागले.

या संदर्भात आणखी एका संस्थेचा उल्लेख करावा लागेल. इ.स. 1848 मध्ये इंग्रजी शिक्षण घेतलेल्या एतद्देशीय नवशिक्षित विद्वानांनी 'स्टुडण्टस लिटररी ॲंड सायन्टिफिक सोसायटी' या नावाची संस्था स्थापन केली. 'उपयुक्त ज्ञान प्रसारक सभा' ही या संस्थेचीच एक शाखा होती.दादोबा पांडुरंग हे या संस्थेचे पहिले अध्यक्ष होते. ''शास्त्रीय व व्यावहारिक विषय स्वभाषेमध्ये शुद्धरीतीने लिहिता यावेत व स्वदेशामध्ये उपयुक्त ज्ञानप्रसार व्हावा, हा या सभेचा उदेश होता'' 'मराठा ज्ञानप्रसारक' नावाचे मासिक ही सभेने काढले होते.

इ.स. 1849 च्या सुमारास कर्नल फ्रेंच व कॅप्टन हार्ट यांनी मुंबई इलाख्यातील थोर व उदार धनिक लोकांच्या साहाय्याने 'दक्षिणी भाषेत पुस्तके प्रसिद्ध करणारी मंडळी' ही स्वतंत्र संस्था स्थापन केली. इंग्रजी भाषेतील उत्तम ग्रंथांची सुलभ मराठीत भाषांतरे करवावी आणि स्वस्त किंमतीत ती लोकांना द्यावी, असा या संस्थेचा उद्देश होता.

सरकारी, निमसरकारी आणि खाजगी अशा सर्व स्तरांवर ग्रंथनिर्मितीचे प्रयत्न झाले. हा उपक्रम महाराष्ट्रात निःसंशय नवीन होता. मुद्रणकला या देशात उपलब्ध झाली, म्हणून हे होऊ शकले तरीही, नव्या परिस्थितीत ज्ञानप्रसाराची आवश्यकता व उपयुक्तता लक्षात घेऊन ग्रंथ-निर्मितीला प्रोत्साहन मिळाले. ही एक शैक्षणिक क्रांतीच म्हणावी लागेल. औद्योगिक क्रांतीमधून ज्याप्रमाणे कामगार वर्ग उदयाला येतो, तसाच शैक्षणिक क्रांतीमधून सुशिक्षितांचा, विचारवंतांचा, ग्रंथकारांचा म्हणजेच बुद्धिमंतांचा वर्ग उदयाला येत असतो. तसा एक वर्ग महाराष्ट्रात उदयाला येत होता. ही सांस्कृतिक परिवर्तनाच्या प्रक्रियेतीलच एक महत्त्वपूर्ण घटना आहे. पुढील काळात गोपाल गणेश आगरकर यांनी एका निबंधात प्रतिपादन केले आहे की, ''विचार करणाऱ्यांचा, श्रम करणाऱ्यांचा आणि सुखोपभोग घेणाऱ्यांचा असे तीन वर्ग समाजात असतात. श्रम करणारा हाच समाजाचा खरा आधारस्तंभ असतो, आणि विचार करणाऱ्यांच्या वर्गाने (म्हणजे बुद्धिमंतांनी) समाजाचे सतत वैचारिक नेतृत्व करायचे असते.'' [6] याचा अर्थ आगरकर वर्गीय संस्कृतीची संकल्पना मांडत होते. पण अशी वर्गीय संस्कृती निर्माण होण्याची प्रक्रिया इंग्रजी राजवटीत सुरु झाली.

ललित वाङ्मयापेक्षाही प्रज्ञाप्रधान व विशेषतः शास्त्रीय ग्रंथलेखनावर या काळात भर होता. व्याकरण ग्रंथ आणि कोशग्रंथही या काळात निर्माण झाले. पुणे पाठशाळेतून तयार झालेल्या शास्त्रीपंडितांनी या बाबतीत महत्त्वाची कामगिरी केली.

संस्कृतीच्या जडणघडणीस भाषा आणि साहित्य यांचीही जडणघडण कशी होत असते, हे यावरून लक्षात येईल. शास्त्राच्या पारिभाषिक संज्ञा तयार होऊन त्या संज्ञा मराठी-भाषेत रूढ होत होत्या. आणि एका अर्थी मराठी भाषा समृद्ध होऊ लागली होती. त्याचप्रमाणे नवशिक्षितांचा विचारप्रवाह मराठीतून वाहू लाहला. त्यामुळे मराठी भाषेतील शब्दसंपत्तीबरोबरच विचारसंपत्ती ही वाढू लागली. नवनव्या विचारांची भर मराठी ग्रंथात पडू लागली.

इ.स. 1854 नंतर आणि विशेषतः 1857 नंतर (मुंबई विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर) ही परिस्थिती पालटली. सरकारने स्वतः ग्रंथ तयार करणे बहुतांशी बंद केले. विद्यापीठातून पदवी घेऊन बाहेर पडलेले विद्वान इंग्रजी बोलत आणि इंग्रजीतच विचार करीत आणि मराठी लिहिताना इंग्रजी विचारांचे मराठी भाषांतर करीत. प्रारंभीच्या काळात जे विविध विषयांवर ग्रंथ निर्माण झाले ते शालेय अभ्यासक्रमाच्या गरजेतून निर्माण झाले. म्हणून त्यांचे स्वरूप जसे शालेय तसेच वळण बळबोध होते. एतद्देशीय लोकांना शहाणे करून सोडायचे, नीतिमान करायचे अशी राज्यकर्त्यांची भूमिका आणि एतद्देशीयांच्या धार्मिक भावना शक्यतो दुखवायच्या नाहीत असे प्रारंभी धोरण होते. त्यामुळे नीतिबोधपर असे कथात्मक साहित्य निर्माण झाले. त्यात धार्मिक भावनांचाही समावेश होता. पाश्चात्य विद्यांचा व शास्त्रांचा परिचय करून देण्यासाठी ग्रंथ निर्माण झाले. त्यात थोडातरी प्रौढपणा होता. इ.स. 1857 नंतर मात्र इंजिनियरींग, वैद्यक व कायदा या विषयांवर ग्रंथ तयार होईनासे झाले. कारण संपूर्णतः शिक्षणाचे माध्यम इंग्रजी आणि मराठी भाषेला अभ्यासक्रमात स्थानच नाही अशी अवस्था निर्माण झाली. त्यातूनच विपरीत आणि चांगले परिणाम दिसून येऊ लागले. हे परिणाम सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण होते. मुख्य विपरीत परिणाम झाला तो म्हणजे त्यानंतरची तरूण पिढीची मने स्वयंसंस्कृतीला पारखी होऊ लागली आणि मनोवृत्तीने विदेशी बनू लागली. चांगला परिणाम असा झाला की, मराठी वाङ्मयाच्या निर्मितीला अनुकूल परिस्थिती निर्माण होऊ लागली. यापूर्वीचे जे वाङ्मय अथवा साहित्य निर्माण झाले ते विवक्षित उद्दिष्ट-पूर्तीसाठी म्हणून तयार करवून घेतलेले, म्हणजे एका अर्थी परप्रेरित स्वरूपाचे होते. त्यानंतर मात्र स्वयंप्रेरणेने ग्रंथनिर्मिती करण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली. पुणे-मुंबई सारख्या शहरात आणि जिल्ह्यांतही मराठी-इंग्रजी शाळा निघू लागल्या.

शिकलेल्यांना सरकारी नोकऱ्या सहज मिळू लागल्या. त्यांतून सरकारी नोकरवर्ग तयार होऊ लागला. सरकारी नोकरी करणाऱ्यांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त होऊ लागली. पैसाही मिळू लागला. प्रतिष्ठा व पैसा या गोष्टींना सामाजिक मूल्य प्राप्त झाले. त्यामुळे शिक्षण घेणाऱ्यांची संख्या वाढू लागली. लोकातही ज्ञानार्जनाची व वाचनाची अभिरूची उत्पन्न झाली. जे आंग्लविद्या विभूषित होते ते पाश्चात्यांचे अनुकरण करीत होते. पण अशा अनुकरणाने आणि स्वतःच्या प्रेरणेनेच ग्रंथलेखनाची प्रवृत्ती होऊ लागली. मागणी आणि पुरवठा एकमेकांना पूरक ठरला, उपकारक ठरला. त्यातच महाराष्ट्रात हळूहळू व्यावसायिकताही निर्माण होऊ लागली. वाचनाची मागणी पुरविण्यासाठी ग्रंथ प्रकाशन आणि प्रकाशनासाठी छापखान्यांची सोय झाली. वस्तुस्थिती अशी होती की सरकारने प्रत्यक्षात ग्रंथ प्रकाशित करणे थांबविलेले होते, मराठी सुशिक्षित समाजात वाचनाभिरूची निर्माण झाली होती. छापखानेही निघू लागले होते. त्यामुळे ग्रंथरचनेस प्रोत्साहन मिळाले.

छापखान्यांमुळे नियतकालिकांची प्रथाही प्रचलित झाली. वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिके इ. रूपाने विद्वानांना मतप्रसारासाठी सुलभ आणि प्रभावशाली साधन हाती आले. ग्रंथलेखनापेक्षा वृत्तपत्रीय लेखन अनेक कारणाकरिता लिहिणाऱ्याला आणि वाचणाऱ्याला आधिक सोयीचे वाटले. वेळ, श्रम, पैसा आणि विद्वता यांची आवश्यकता ग्रंथापेक्षा कमी त्यामुळे प्रचार व प्रसार होण्यासाठी नियतकालिकांचे फार मोठे साह्य झाले. या माध्यमाद्वारे जास्तीत जास्त लेखन होऊ लागले.

नियतकालिकांनी साहित्यनिर्मितीस हातभार लावला, त्याचप्रमाणे या काळात धार्मिक व सामाजिक प्रबोधनांची जी प्रक्रिया सुरु झाली होती आणि पुढील काळात जे राजकीय प्रबोधन झाले त्यात नियतकालिकांनी अनमोल कामगिरी केली.

इंग्रजी राजवटीत महाराष्ट्रात जे सांस्कृतिक परिवर्तन होऊ लागले. ते प्रामुख्याने शिक्षण, ग्रंथनिर्मिती, छापखाने, नियतकालिके, अशा प्रमुख घटकांच्या द्वारे. सांस्कृतिक दृष्ट्या समाजात अभिसरण होत होते. अशा परिस्थितीत जे लोक ग्रंथलेखनास प्रवृत्त झाले त्यांची मनोवृत्ती भिन्न भिन्न प्रकारची होती.

काही मंडळी जुन्या परंपरेत म्हणजे एत्तद्देशीय संस्कृतीतच तयार झाली होती. हे सर्व बुद्धिवान, व्यासंगी, विद्वान असे शास्त्री पंडित होते. कित्येकांनी इंग्रजी ज्ञान नंतर संपादन केले होते. या शास्त्री पंडितांची

संस्कृत वाङ्मयावर भक्ती होती. त्याचाच परिणाम त्यांच्या ग्रंथनिर्मितीवर झाला. मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली त्यानंतरच्या काळात स्वसंस्कृतिविन्मुख व विदेशीवृत्तीची बनत चाललेली तरूण पिढी आणि त्यानंतरची मंडळी, यांच्यातून पाश्चात्य संस्कृतीचा अभिमानी असा आंग्लविभूषितांचा वर्ग समाजात वाढू लागला. या नव्या वर्गाला संस्कृतीचे एकांगी दर्शन घडले होते. त्यातूनच एक प्रकारची स्वाभिमानशून्यता प्रत्ययाला येऊ लागली. पण ही अवस्था पाहून सुधारणा व्हावी असे काहींना वाटत होते. ज्ञानार्जन आणि विद्याप्रसार या द्वारेच सुधारणा होऊ शकते असा त्यांचा विश्वास होता. या विश्वासानेच त्यांनी ज्ञानविद्या प्रसारार्थ नियतकालिके व मासिके काढली. या मंडळीतूनच पुढे सुधारकपक्ष निर्माण झाला. असा पक्ष निरनिराळ्या सामाजिक, धार्मिक संस्थांच्या कार्यातून घडत होता. 'कल्याणोन्नायक मंडळी', 'परमहंस मंडळी', 'आर्यसमाज', 'प्रार्थना समाज' या संस्थाचे कार्य सामाजिक व धार्मिक प्रबोधनाच्या दृष्टीने निःसंशय महत्त्वपूर्ण आहे.

सुधारकांच्या विचारंना मूळ चालना मिळाली ती ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या उपक्रमातून, महाराष्ट्रात ब्रिटिशांची राजवट प्रस्थापित होण्यापूर्वी महाराष्ट्राबाहेर ख्रिस्ती मिशनऱ्यांनी धर्मप्रसाराच्या हेतूनेच शिक्षणप्रसाराचे व ग्रंथनिर्मितीचे प्रयत्न केले होते.

महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक व वाङ्मयीन इतिहासात मिशनऱ्यांच्या चळवळींना व उपक्रमांना महत्त्वपूर्ण स्थान आहे. धर्मप्रसारासाठी त्यांचे धोरण दूरदर्शी होते. त्यांनी सहेतुक मराठी भाषेचा अभ्यास केला. त्यांच्या उपक्रमामागे धर्मप्रचाराचा हेतू जरूर होता पण त्यातूनच अर्वाचीन मराठीतून गद्य वाङ्मयाचा पाया घातला गेला. वस्तुस्थिती अशी होती की मिशनऱ्यांच्या शैक्षणिक चळवळीचे यश पाहून सरकारने अशा उपक्रमांकडे आपले लक्ष पुरविले.

ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या प्रचारात ख्रिस्ती धर्माचे मंडन आणि हिंदूधर्माचे विडंबन असे. आपल्या धर्मात जर उणीवा असतील, अपप्रवृत्ती असतील तर मिशनऱ्यांना त्यांचे विडंबन करण्याची संधी न देता आपणच आपल्या धर्मात आणि पर्यायाने धर्मनिष्ठ समाजव्यवस्थेत आवश्यक ती सुधारणा कालमानानुसार घडवून आणावी अशी चालना उपरोक्त सुधारकांच्या विचारांना मिळाली.

सुधारक आणि मिशनरी ह्याच्या भूमिकेतून जे प्रयत्न झाले त्यामुळे समाजात जागृती उत्पन्न झाली. आणि ग्रंथकारांचा एक नवाच वर्ग निर्माण होऊ लागला. या नव्या वर्गाला स्वराज्य गेल्याबद्दल हळहळ वाटू लागली. परराज्याचे आणि त्यांनी लादलेल्या राजकीय व सामाजिक गुलामगिरीचे शल्यही त्यांना बोचू लागले. जनसामान्यांचे डोळे इंग्रजी कर्तृत्त्वाने दिपून जातील अशा भौतिक सुधारणा राज्यकर्त्यांनी घडवून आणल्या. इ.स. 1829 मध्ये सतीची चाल बंद करण्याचा कायदा केला. सन 1836 मध्ये ठगांचा बंदोबस्त केला. इ.स. 1841 मध्ये गुलामगिरीचा कायदा केला, सन 1853 मध्ये पहिली आगगाडी मुंबई-ठाणे सुरु केली आणि 1857 च्या एतद्देशीय लोकांच्या उठावामुळे भारताचा राजकीय नकाशाच बदलून गेला.

प्रारंभीच्या काळात सरकारने ग्रंथनिर्मितीचे, ग्रंथप्रकाशनाचे, फार मोठे कार्य केले. मेजर कँडी, कॅप्टन जर्विस, इ. इंग्रज अधिकाऱ्यांना त्यातले फार मोठे यश जात असले तरीही एतद्देशीय शास्त्रमंडळींना, भाषांतरकार, सहाय्यक अशा भूमिका पार पाडाव्या लागत. आणि नवशिक्षितांना चांगल्या चांगल्या हुद्यावर सरकारी नोकऱ्या मिळत होत्या. नवा ग्रंथकारांचा जो वर्ग निर्माण होत होता तो अंतर्मुख बनला. थोडे फार आत्मसंशोधन करू लागला. आपला धर्म, आपला इतिहास, आपले वाङ्मय, इ. नव्या दृष्टिकोनातून हे ग्रंथकार अभ्यास करू लागले. जुन्या बखरी, जुनी काव्ये, जुन्या इतिहासाची साधने एकत्र करु लागले. हे सर्व करीत असताना एत्तद्देशीय जुन्या आणि प्राचीन परंपरा व इतिहास यातील उज्ज्वलता त्यांच्या प्रत्ययाला येऊ लागली आणि नव्या जाणिवेचा उद्‌भव होऊ लागला. सांस्कृतिक दृष्ट्या भौतिक जीवनात जे घडत होते, म्हणजे राजकीय गुलामगिरीच्या काळात जे आचार, विचार, आणि व्यवहार होत होते, त्यांची एक वेगळीच पण तितकीच अन्वर्थक प्रतिक्रिया म्हणून ही जाणीव महत्त्वपूर्ण होती. अर्वाचीन वाङ्मयाच्या नव्या पर्वाची बीजे या जाणिवेत होती. ही जाणीव फुलवण्याचा प्रयत्न पुढे विष्णुशास्त्री चिपळूणकर, नीळकंठ जनार्दन कीर्तने, इ. पाश्चात्य विद्यालंकृत मंडळींनी जाणीवपूर्वक केला.

‘‘या कालखंडाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य असे की, भाषेला आणि पर्यायाने त्या भाषेत निर्माण होणाऱ्या साहित्याला सांस्कृतिक मूल्य प्राप्त झाले. प्रारंभी बहुतांशी सांस्कृतिक घडामोडींची सूत्रे

राज्यकर्त्यांचाच हाती होती. परंतु नवीन विचारदृष्टी लाभल्यानंतर सामाजिक, धार्मिक, राजकीय प्रबोधन होऊ लागले, नव्या शिक्षणाचे काही परिणाम दिसू लागले. त्यामुळे भारतीय अथवा एतद्देशीय संस्कृतीचा वारसा कोणता आहे, याची कल्पना राज्यकर्त्यांना आली. त्याचप्रमाणे आपल्या जुन्या सांस्कृतिक ठेव्याकडे बुद्धिनिष्ठ, चिकित्सक, ऐतिहासिक अशा नव्या दृष्टीने पाहण्याची प्रेरणा एतद्देशीयांना मिळाली. त्यामुळे स्वाभाविकच कालांतराने एतद्देशीयांच्याही मनात प्राचीन संस्कृतीविषयीचा अभिमान जागृत झाला. भारतीय संस्कृतीची गौरवगाथा तयार झाली आणि मालोत्तर काळातील राष्ट्रीय प्रवृत्तीच्या जाणिवेची आणि राजकीय प्रबोधनाची बीजे त्यातच रूजवली गेली.'' [7] प्रारंभी ख्रिस्ती धर्म प्रसारकांच्या प्रचाराला बळी पडून धर्मांतर करण्याची प्रवृत्ती बळावत होती. यापासून समाजाला परावृत्त करण्यासाठी ब्राह्मोसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज यांचे कार्य महत्त्वाचे आहे. इंग्रजी राजवटीत छापखाने, वृत्तपत्रे, शाळा, कॉलेज, वक्तृत्त्वसभा, चर्चामंडळे इ. चे आकर्षण निर्माण झाले. नव्या शिक्षणाचा लाभ मध्यमवर्गाला झाला. अशा शिक्षणाची महती व गरज त्यांना पटली. कंपनी सरकारने मध्यमवर्गाला हाताशी धरून एक नवेच पुढारीपण निर्माण केले. इंग्रजी राजवटीत हळूहळू इनामदार, जहागीरदार, वतनदार, इ. वर्चस्व नष्ट होत गेले. नवा सुशिक्षित, सुसंस्कृत, स्वाभिमानी मध्यमवर्ग उदयाला आला होता, त्याच्याच हाती नकळत सांस्कृतिक घडामोडींची सूत्रे गेली आणि सांस्कृतिक जीवनात, वाङ्मयीन व्यवहारात मध्यमवर्गीयांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. त्यामुळे मध्यमवर्ग विरूध्द बहुजनसमाज असा अंतर्विरोध पुढील काळात तीव्र स्वरूप धारण करू लागला.

नवे प्रबोधन घडले तेव्हा इंग्रजी वर्चस्वाविरूद्ध सामाजिक, धार्मिक, राजकीय आणि वाङ्मयीन क्षेत्रात मध्यमवर्गाने पुढारीपण पत्करले. परंतु मध्यमवर्गाच्या वर्चस्वाविरूद्ध बहुजनसमाजाला जागृत करण्याचा प्रयत्न अपरिहार्यपणे होऊ लागला. 1874 मध्ये निबंधमाला अवतरली. पण त्याहीपूर्वी एक वर्ष आधी 1873 मध्ये ज्योतीबा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचा प्रारंभ झाला. त्या चळवळीनेही एका वेगळ्या स्तरावर नवे पर्व सुरू केले होते. या पार्श्वभूमिवर बडोदे संस्थानातील मराठी भाषा व वाङ्मय या संबंधी विचार आवश्यक आहे.

## आ) बडोदे संस्थानातील मराठी भाषा व मराठी वाङ्मय :

मराठ्यांना गुजरातचा पहिला परिचय होऊन जवळ जवळ तीनशे वर्षे झाली आहेत. गायकवाडांच्या इतिहासाची उपलब्ध साधने ('बडोद्याचे राज्यकर्ते' पृ. 34, 37,38) 'बडोद्याचे मराठी साहित्य' व इतर उपलब्ध ग्रंथ यांच्या आधारे या कालखंडाचे प्रामुख्याने तीन भाग पडतात. पहिला इ. स. 1732-1793 हा साठ वर्षांचा काल राज्यक्रांतीचा म्हणावा लागेल. दुसरा इ.स. 1793-1873 हा ऐंशी वर्षांचा काल अंतःस्थ कलहाचा व अस्वस्थतेचा उल्लेखिता येईल. तर 1873-1933 हा साठ वर्षांचा काल शांततेचा, सुव्यवस्थेचा म्हणता येईल. पहिल्या राज्यक्रांतीच्या कालखंडात बडोद्यात महाराष्ट्र संस्कृतीचे बीजारोपण झालेले आढळते, तर दुसऱ्या अस्वस्थतेच्या कालात या संस्कृतीचे बऱ्यावाईट पद्धतीने जतन केलेले दृष्टोत्पत्तीस येते आणि तिसऱ्या म्हणजे अखेरच्या साठ वर्षांत मराठी संस्कृती, मराठी भाषा व मराठी वाङ्मय यांचा उत्कर्ष जोमाने झालेला आढळतो. म्हणजे याच तिसऱ्या कालखंडात महाराष्ट्र संस्कृती आणि मराठी वाङ्मय यांच्या अभिवृद्धीस प्रारंभ झाला असे म्हणावे लागेल.

या अभिवृद्धीच्या कालाचा श्रीगणेशा कै. श्रीमंत गणपतराव महाराज गायकवाडांच्या कारकीर्दीपासून झाला असे म्हणणे योग्य होईल. बडोद्यास पहिल्याने स्थापन झालेल्या 'ग्रंथसंपादक आणि प्रसारक' मंडळीच्या (स्थापना : इ.स. 1897) पहिल्या पंचवार्षिक समारंभाचे वेळी (इ.स. 1902) श्रीमंत सयाजीराव महाराजांनी केलेल्या भाषणात, ''या राज्यात कै. श्रीमंत गणपतराव महाराजांच्या कारकीर्दीत या मुद्रणकलेस सुरुवात झाली'' असे म्हटले आहे. श्री गणपतराव गायकवाड यांनी इ.स. 1849 साली 'दक्षिणी भाषेत पुस्तके प्रसिद्ध करणारी मंडळी' या संस्थेस पाच हजार रुपये बक्षीस म्हणून दिले असल्याचा उल्लेख आढळतो. होनाजी बाळा, सगनभाऊ या प्रसिद्ध शाहीरांना बडोद्याच्या अधिपतींचा पुष्कळ आश्रय व मदत असे. अनंतफंदी हे तर बडोद्याचेच वतनदार होते. त्यांचे नातू स्वतः आख्याने रचून बडोद्यास कीर्तने करीत असत. खंडेराव महाराज हे सुद्धा अशा गुणी लेखकवर्गास चांगला आश्रय देत आणि त्यांच्यानंतर श्री जमनाबाईसाहेब यांनीही परंपरा चालूच ठेवली होती.

सयाजीराव महाराजांना अधिकार प्राप्त झाल्यावर त्यांनी आपले लक्ष लवकरच वाङ्मयाकडे वळविले. बखरी आणि राजकीय पत्रव्यवहार वगळला तर इंग्रजशाहीच्या सुरुवातीपर्यंत मराठी गद्य असे फारसे नव्हतेच. मराठीतील स्वतंत्र वाङ्मय निर्माण करणारे पहिले लेखक कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी आपल्या निबंधमालेचा आरंभ सन् 1874 साली म्हणजेच महाराजांच्या राज्याभिषेकाच्या सुमारासच केला होता. त्यापूर्वी 50 वर्षांत मराठीत फारच थोडे ग्रंथ प्रसिद्ध झाले होते. सन् 1874 साली निबंधमालेस सुरुवात करताना विष्णुशास्त्री यांनी मराठी भाषेची सांप्रतची स्थिति हा पहिलाच निबंध लिहिला, त्यात त्या वेळच्या मराठी ग्रंथासंबंधाने त्यांनी जे म्हटले आहे, ते तत्कालीन परिस्थितीचे निदर्शक आहे.

''इंग्लिश भाषेत पहिल्यानेच गति होऊन त्यातील सुरस ग्रंथांची आपल्या लोकांस जेव्हा गोडी लागली, तेव्हा त्यासारखे आपल्याही भाषेत काही करावे अशी त्यांस सहजच मोठी हौस वाटली. मग पुष्कळांनी हा उद्देश भाषांतरद्वारा सिद्धीस नेला. यांच्या योगाने लोकांचे पुष्कळ हित झाले. व इंग्रजी भाषेची योग्यता सर्वांस स्पष्टपणे कळून आली. पुढे कित्येकांनी यावरहि तोड करण्याचे मनात आणिले. कोणी इंग्रेजी ग्रंथांच्या नमुन्यावर कल्पित कथा, नाटके व इतर ग्रंथ केले व कोणी इंग्रेजीतीलच गोष्टींचे देशाचारानुरोधाने रुपांतर करुन मराठी ग्रंथ बनविले. तशीच संस्कृतातूनहि काव्यादि ग्रंथांची भाषांतरे होऊन भाषेची व रसिकत्वाची लोकात वृद्धि होण्यास बरीच कारणे झाली.''[8] वरील उताऱ्यावरुन मराठी गद्याच्या आरंभकाळी भाषांतरावरच विशेष अवलंबून राहावे लागत असे. ही भाषांतरे सर्वच चांगली असत, असे नाही. परभाषेतील ग्रंथांचे रहस्य आपल्या भाषेत आणताना नवीन विचार, कल्पना व शब्द त्यात आणावे लागतात. या संबंधाने कै. विष्णुशास्त्री हे आपल्या 'भाषांतर' या निबंधात म्हणतात. ''भाषा जी प्रगल्भ दशेस चढते, ती केवळ सृष्टीनियमानुसारानेच चढते असे नाही. म्हणजे प्राणी किंवा वनस्पति यांची वाढ जशी नियमाने व्हावयाचीच, तशी काही भाषेची गोष्ट नाही. तिची अभिवृद्धी मुख्यतः मनुष्यप्रयत्नानेच आहे.''[9]

देशीभाषेच्या अभिवृद्धींचे हेच धोरण महाराजांनी आपल्या कारकीर्दीच्या आरंभी स्वतंत्रपणे स्वीकारले. सन् 1889 च्या जानेवारीतील एका पत्रात त्यांनी आपले बंधु श्री संपतराव यांस लिहिले होते की,

''क्रोके या खेळाच्या पुस्तकाचे मराठी भाषांतर केलेले पुस्तक आपण पाठविले, ते पोचले. पुस्तक सुंदर झाले आहे, ते विकले जाईल अशी व्यवस्था करावी. या पुस्तकाचे गुजराथी भाषेत पण बालबोध लिपीत भाषांतर करवावे. अशाच प्रकारे इतर ग्रंथांची मराठी व गुजराथी भाषांतरे करवीत जावी'' [10]

हा उल्लेख प्रासंगिक आहे. देशी भाषेत चांगले ग्रंथ निर्माण करण्यासंबंधाने सरसहा धोरण ठेवण्याच्या हेतूने महाराजांनी यानंतर हुजूर हुकूम केले. त्यात म्हटले आहे की,

''देशी भाषांतील ग्रंथसामग्री वाढावी, या उद्देशाने परभाषेतील ग्रंथांची भाषांतरे करविण्याची व नवीन पुस्तके लिहिण्यास आश्रय व उत्तेजन देण्याची योजना विद्याखात्याने करवावी. खर्चाच्या प्रमाणाने सरकारचा हेतु पार पडण्यासारखे कायम झाले आहे की नाही याबद्दल खात्री करुन घ्यावी व सरकारचा खर्च गैररीतीने न होण्याबद्दल सर्वांनी सावधगिरी ठेवावी. पुस्तके करण्याबद्दलच्या व त्यासाठी उत्तेजन किंवा पारितोषिक मिळण्याबद्दलच्या मागण्या निरनिराळ्या खात्यांकडे न येता एकाच खात्यांत याव्या. एखादा नवीन ग्रंथ करविण्याचे किंवा भाषांतर करविण्याचे काम हुकूम घ्यावयासाठी रुजू करण्यात आलें तर त्याच्या खर्चाबरोबरच ते छापविण्याचा खर्च किती येईल, त्याचाहि अजमास दाखवीत जावा, आणि नवीन अगर तर्जुमे केलेली पुस्तके सरकारी खर्चाने तयार करवून त्यावर सर्व प्रकारे सरकारचा हक्क ठेवावा.'' [11]

ह्या धोरणाने देशी भाषेतून ग्रंथ तयार करविण्यास महाराजांनी सुरुवात केली. निरनिराळ्या खेळांसंबंधाच्या पुस्तकांची 'क्रीडामाला', पाकशास्त्रावरील पुस्तकांची 'पाकशास्त्रमाला', प्राचीन काळच्या निरनिराळ्या देशांच्या इतिहासांवरील पुस्तकांची 'राष्ट्रकथामाला', शास्त्रीयज्ञान विषयक 'सयाजीज्ञानमंजूषा' आणि 'लघुज्ञानमंजूषा', त्याचप्रमाणे 'महाराष्ट्र ग्रंथमाला' व 'धर्मशास्त्र-ग्रंथमाला', इतक्या माला व त्याशिवायचे सुमारे 52 संकीर्ण ग्रंथ मिळून सुमारे 105 ग्रंथ महाराजांनी आपल्या पहिल्या अमदानींत तयार करवले. या कामी कै. शंकर मोरो रानडे या विद्वान गृहस्थांनी पुष्कळ उपयुक्त कार्य केले. 'नाट्यकथार्णव' नावाची स्वतंत्र नाटकांची माला यांनी लिहिली होती. रानडे हे अतिशय विद्वान असून त्यांची प्रतिभा अष्टपैलू होती. हव्या त्या विषयावर वाटेल त्यावेळी ते लेख लिहू शकत, अशी त्यांची ख्याती असे. ऐनेराजमहेल अथवा राजवाडादर्पण हा मोठा ग्रंथ त्यांनी शास्त्रीमंडळींच्या साह्याने महाराजांच्या आज्ञेने इ. स. 1888

साली लिहिला. त्यात राजघराण्यात होत असलेली वार्षिक कृत्ये व त्यासंबंधाने निरनिराळ्या खात्यांकडून होत असलेल्या व्यवस्थेची समग्र माहिती दिली आहे. हा ग्रंथ आपल्या समाजांतील चालीरीतींची व धार्मिक विधींची साधारण माहिती लोकांना असावी या हेतूनें तयार करविण्यांत आला होता. त्याचप्रमाणे या चालीरीतींच्या संख्येत वाढ न व्हावी व एकदाच सर्व विधी निश्चित केले जावे, हा फायदाही त्यामुळे होणार होता. 'वधूवरपरिक्षा' हे व्यवहारोपयोगी पुस्तकहि त्यांनी लिहिले आहे. याच कालखंडात रा. गोविंदराव सरदेसाई यांनी आपल्या ग्रंथलेखनास प्रारंभ केला. पुढे रियासतकार म्हणून ते प्रसिद्धीस आले. 'राष्ट्रकथामाला' व 'महाराष्ट्र ग्रंथमाला' या दोन मालांची सर्व व्यवस्था आरंभी त्यांच्याकडेच असे. पुढे ती विद्याखात्याकडे सोपविण्यात आली. त्यांनी आपल्या सुप्रसिद्ध रियासती लिहिण्यास बडोद्यातच सुरुवात केली. त्या रियासतीचे आरंभीचे खंड त्यांनी आपल्या स्वतःच्या जबाबदारीवरच प्रसिद्ध केले. नंतरच्या खंडांपैकी मध्यविभाग 2 व 3 हे पानिपत प्रकरण विषयक दोन भाग बडोद्याच्या सरकारी आश्रयाने प्रसिद्ध झाले आहेत.

महाराजांना देशी भाषातील ग्रंथनिर्मितीच्या कामी या आरंभाच्या काळात कै. त्रिभुवनदास गज्जर यांची मदत झाली. महाराजांनी सन् 1888 साली शास्त्रीय शिक्षणाची पुस्तके गुजरातीत तयार करविण्यासाठी 50,000/- रूपयांची रक्कम मंजूर करुन त्याबद्दलची सर्व व्यवस्था प्रो. गज्जर यांच्याकडे सोपविली. या मालेतून निरनिराळ्या शास्त्रांवरील पुस्तके तयार करविण्यात आली. येथपर्यंत विद्वान लोकांकडे देशी भाषेत ग्रंथ तयार करविण्याचे काम सोपून ते ज्यांची योजना करतील त्या लेखकांकडून ती पुस्तके लिहवून घेण्यांत येत, परंतु इ.स. 1893 साली सरकारमार्फत विद्वान लेखकांना नोकरीत ठेवून त्यांच्याकडून ग्रंथ लिहिण्याची व्यवस्था करण्यात आली. त्यापैकी मणिलाल द्विवेदी नावाचे एक गृहस्थ होते. त्यांनी बडोदे राज्यातील पाटण येथील प्रसिद्ध जैनभांडारातून एकवीस ग्रंथांचे संशोधनात्मक भाषांतर केले होते. हे सारे ग्रंथ प्रसिद्ध करविण्यात आले. हीच भाषांतरशाखेची पहिली स्थापना होय. या शाखेमार्फत अनेक ग्रंथ प्रसिद्ध करण्यात आले. तरी ते ग्रंथ निवडण्याच्या कामी एकसहा धोरण त्या काळी घातले गेले नव्हते, म्हणून सन् 1908 साली महाराजांनी विद्याधिकारी खात्याच्या हाताखाली काम करणारी भाषांतरशाखा नवीन पद्धतीवर स्थापन

केली. या शाखेमार्फत प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांचे "Literature of Knowledge" व "Literature of Power" म्हणजे 'ज्ञानवर्धक वाङ्मय' व 'तेजोवर्धक वाङ्मय' असे मुख्य दोन भाग करण्यात आले व या दोन्ही प्रकारच्या पुस्तकांचा प्रसार समाजाच्या अगदी खालच्या थरापर्यंत गेला पाहिजे अशा अपेक्षेने ही पुस्तके लिहिली जावी, असा आपला उद्देश महाराजांनी प्रकट केला. याच दृष्टीने सन् 1904 साली पुणे येथील न्यूइंग्लिश स्कूल या शाळेला भेट देतेवेळी महाराजांनी म्हटले आहे की, ''जिने कार्यकारणांचा योग्य संबंध कळतो, सामाजिक, राजकीय, धार्मिक, औद्योगिक वगैरे बाबतीतील आपली दुरवस्था आपल्याला कळून ती अशी का झाली याची कारणे शोधून काढता येतात, आणि सर्व विषयांचा न्यायाने व समतेने विचार करण्याची पात्रता येते, तीच खरी विद्या होय.'' [12]

अशा विद्येचा प्रसार करण्यासाठी देशी भाषेतून पुस्तके प्रसिद्ध करण्याचे धोरण महाराजांनी स्वीकारले. तथापि प्रारंभीच्या उपक्रमात महाराजांना हवे तितके यश मिळाले नाही. यामुळेच इ.स. 1910 साली मुंबई येथील ग्रंथसंपादक मंडळीकडून दिल्या गेलेल्या मानपत्राच्या प्रसंगी महाराजांनी याची जाणीव व्यक्त करून म्हटले की, ''माझ्या संस्थानात आतापर्यंत जी पुस्तके सरकारच्या मदतीने प्रसिद्ध झाली आहेत, त्यांत दोष आहेत हे मी कबूल करतो. यापेक्षा ती पुस्तके अधिक चांगली तयार करता आली असती. यापुढे जे ग्रंथ प्रसिद्ध होतील, ते अधिक चांगले होण्याविषयी खबरदारी घेण्यांत येईल''[13]

इ.स. 1901 साली ग्रंथसंपादक मंडळीच्या पाचव्या वार्षिक समारंभप्रसंगी केलेल्या भाषणावरुन त्यांनी पूर्वीपासून सरकारी आश्रयाने प्रसिद्ध करविल्या जाणाऱ्या ग्रंथांचे धोरण निश्चित करुन ठेवल्याचे दिसते. या भाषणात सयाजीमहाराजांनी आपल्या समाजाची चिकित्सा करुन म्हटले आहे की,

''साधारणतः आपल्या समाजाचे चार वर्ग पडतात. ते 1. सुशिक्षित लोक, 2. राजे व सरदार वर्ग, 3. व्यापारी व 4. शेतकरी आणि इतर खालच्या जाती हे होत. या पैकींच्या पहिल्या वर्गावरच ज्ञानप्राप्तीसाठी इतर तीन वर्ग अवलंबून असतात. दुसऱ्या वर्गाचे लोक आपल्या पूर्वीच्या उच्च दर्जापासून सांप्रत ढळले आहेत व बाकीचे दोन वर्ग तर अजून बहुतांशी अशिक्षितच आहेत. म्हणून त्यांना ज्ञान मिळेल असे ग्रंथ लिहून प्रसिद्ध करण्याची जबाबदारी मुख्यतः पहिल्या वर्गावरच आहे. यासाठी प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथसंबंधाने

उपयुक्ततेची दृष्टि तुम्ही आपल्या नजरेपुढे ठेविली पाहिजे. व्यापार, शेतकी वगैरे व्यवसायांच्या लोकांनाहि प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांतून आपआपल्या उद्योगाचे ज्ञान मिळेल, अशी योजना झाली पाहिजे.'' [14]

इंग्रजीतील ग्रंथांप्रमाणेच संस्कृत भाषेतील उत्तम ग्रंथांची भाषांतरे करविण्याची व्यवस्थाहि महाराजांनी लवकरच सुरु केली. येथील श्रावणमासदक्षिणेपैकीचे दरसाल 5,500/- रुपये नवी पुस्तके तयार करविण्यासाठी त्यांनी दिले व नंतर त्याच निधीतून ''धर्मशास्त्रावरील उत्तम पुस्तके मराठीत प्रसिद्ध करण्यासाठी दरसाल 10,000/- रुपये खर्च करण्याचा हुकूम दिला.'' [15] याच रकमेतून 'दत्तकचंद्रिका', 'निर्णयसिंधु', 'विवादताण्डव', 'संस्कारकौस्तुभ', 'दानचंद्रिका', 'आचारमयूरव' व 'ब्रह्मसूत्रभाष्या'सारखे कित्येक उत्कृष्ट ग्रंथ भाषांतरित होऊन प्रकाशित झाले आहे. संस्कृत भाषेतील पुस्तकांचे इतिहास, शास्त्र, नाटके व धर्म असे चार भाग पाडून त्यांतील ग्रंथ मराठीत आणविण्यासाठी व्यवस्था त्यानी केली. सर्व देशी भाषांची जननी म्हणून संस्कृत भाषेचे महत्व फार मोठे आहे, याची जाणीव महाराजांना होती. या संबंधाने इ.स. 1909 साली बडोद्यास भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या प्रसंगी केलेल्या भाषणात ते म्हणतात,

''देशी भाषेच्या प्रवेश विश्वविद्यालयात व्हावा असे माझेहि मत आहे. देशीभाषेच्या द्वारें शिक्षण देण्याचा उपक्रम युनिव्हर्सिटी कधी करील तो करो, पण आम्ही मात्र तशी सुरुवात केली पाहिजे. देशी भाषा सर्वांस समजतील अशा सुलभ आहेत. तथापि त्यांचा प्रसार करितांना त्यांची जननी जी संस्कृत भाषा तिला मात्र कमीपणा येऊ देता कामा नये.''[16]

अशा रीतीने नवीन पुस्तके तयार करविण्याप्रमाणेच निरनिराळ्या भाषांची साहित्यसंमेलने आपल्या राजधानीत भरवून, त्यांना उदार आश्रय देण्याने ही त्या भाषांच्या अभिवृद्धीला महाराजांनी मदत केली आहे. मराठीचे पहिले महाराष्ट्र साहित्यसंमेलन भरविण्याचा मान बडोद्यालाच मिळाला आहे. या साहित्यसंमेलनास 'सहावे' साहित्य संमेलन म्हटले गेले आहे. त्यापूर्वी भरलेली संमेलने स्थानिक स्वरूपाची असून, त्यांना 'ग्रंथकारांची संमेलने' असे म्हटले जात असे. 'महाराष्ट्र साहित्यसंमेलन' हे व्यापक नाव बडोद्यासच प्रथमत: उपयोजिले गेले. हा समारंभ सन् 1909 साली झाला. त्याच्या अहवालांत त्या बद्दलचे वर्णन दिले आहे. त्यात असे म्हटले आहे की, ''हे संमेलन बडोदे येथील न्यायमंदिराच्या पटांगणांत मुद्दाम

उभारलेल्या व उत्तम रीतीने शृंगारिलेल्या मंडपात भरविण्यात आले होते. या संमेलनासाठी मुंबई, पुणे, सातारा, कोल्हापूर, वऱ्हाड व मध्यप्रांत, इंदूर, कलकत्ता, काशी, मद्रास, इलारवा, म्हैसूर, राजपुताना, गुजरात वगैरे शहरातून व प्रांतातून आलेले सन्मान्य विद्वान व विदुषी यांचा बराच मोठा समाज जमला होता. या शिवाय प्रेक्षकांचा जमाव एवढा होता की, तिकिटे देऊन निवडक गृहस्थांस आत सोडण्याची व्यवस्था केली होती, तरी संमेलनाचा भव्य मंडप गच्च भरुन गेला होता.''[17]

या संमेलनाचे अध्यक्ष कै. ले. कर्नल कीर्तिकार होते. या वेळी महाराजांनी आपल्या भाषणात मराठी भाषेच्या उन्नतीच्या या प्रयत्नाचे अभिनंदन तर केलेच, शिवाय ''या भाषेचा विचार आपण प्रांतिक दृष्ट्या करुं नका, राष्ट्रीयदृष्ट्या करा. सर्व राष्ट्राचा उद्धार देशी भाषांच्या द्वारे झाला पाहिजे'' [18] अशी मार्मिक सूचना करून आपली अखिल भारतीय दृष्टी त्यांनी व्यक्त केली. या विचारातील व्यापकता आजही तितकीच अधिक संदर्भयुक्त अशी आहे. 1909 सालीच देशीभाषेविषयी एवढा महत्त्वाचा विचार मराठीतील अत्यल्प अशा विद्वानांत मांडला गेला असावा असे म्हणता येईल.

अशा साहित्यसंमेलना व्यतिरिक्त ग्रंथ संपादक मंडळीचे वार्षिक समारंभ, बडोद्याच्या सहविचारणी सभेचे समारंभ, सार्वजनिक व्याख्याने, वगैरे अनेक प्रसंगांत स्वत: भाग घेऊन त्यांनी वाङ्मयाला उत्तेजन दिले आहे.

या प्रमाणे इतरांकडून चांगले वाङ्मय तयार करुन घेत असतानाच ते स्वत: सुद्धा लेखन व्यासंग करीत होते. गिबनच्या 'रोमन साम्राज्याचा अपकर्ष व ऱ्हास' या ग्रंथावरुन त्यांनी स्वत: इंग्रजीत त्याचा सारांश काढला व त्याचे भाषांतर कै. राजाराम रामकृष्ण भागवत यांच्याकडून करवून प्रसिद्ध केले. या ग्रंथावरून वाङ्मयाबद्दलची त्यांची आवड स्पष्ट होते.''

आपल्या संस्थानात शिक्षणाचा रुंद व खोल पाया घातल्यावर त्या पायावर वाङ्मयाची इमारत उभारणे त्यांना आवश्यक वाटत होते. या जवाबदारीची जाणीव त्यांना आरंभापासूनच होती. व जसजशी प्रजा सार्वत्रिक व सक्तीच्या शिक्षणाच्या योजनेने तयार होत होती, तसतसे त्यांच्यासाठी चांगले वाङ्मय निर्माण करण्याची व्यवस्था महाराज करीतच होते. ही गोष्ट सन् 1921 साली बडोद्यास भरलेल्या दहाव्या

मराठी साहित्य संमेलनाच्या प्रसंगी त्यांनी केलेल्या भाषणावरून प्रतीत होते. या भाषणात त्यांनी असे म्हटले आहे की ,...

''निरनिराळ्या उपयुक्त विषयांवर पुस्तके तयार झाल्याशिवाय शिक्षणाचे कार्य सिद्धिस जाणार नाही. भाषेत जर चांगले ग्रंथ निपजले नाहीत, तर लोकशिक्षणाचे सर्व प्रयत्न लंगडे पडतात; इतकेच नव्हे तर चांगली पुस्तके समाजास न मिळाल्याने लोकांची प्रवृत्ति सदोष पुस्तके वाचण्याकडे होते. मनुष्यामध्ये तृषा उत्पन्न करावी आणि ती भागविण्याचे साधन त्यांना देऊ नये, तशातला हा प्रकार आहे. अर्थात उपयुक्त ग्रंथ उत्पन्न करण्याची निकड केवढी आहे, हे आपल्या निदर्शनास येईल. देशी भाषांत चांगले ग्रंथ तयार करण्यासंबंधाने माझे प्रयत्न फार वर्षांपासून चालू आहेत, हे आपणांस मशहूर आहेच. अनेक प्रकारे उत्तेजन देऊन व पुष्कळ खर्च करुन मी या दिशेने होईल तितका प्रयत्न करीत आलो आहे.'' [19]

अशा प्रकारे आपल्या राज्यात राष्ट्रीयत्वाची स्फूर्ति महाराजांनी उत्पन्न केल्यामुळे तेथे साहित्याच्या अभिवृद्धिचे कार्य प्रत्यक्ष त्यांच्या प्रेरणेनेच झाले आहे. इ.स. 1932 साली बडोद्यास भरलेल्या द्वितीय वाङ्‌मय परिषदेचे वेळी त्यांनी केलेल्या भाषणात ते म्हणतात,

''साधारणत: असे दिसून येते की, राष्ट्रीयतेची जाणीव ज्या वेळी तीव्र असते, त्या वेळी त्या देशात वाड्मय, कला वगैरेचा उत्कर्ष होतो. सन् 1620 ते 1820 व त्यातहि विशेषत: शिवाजीच्या काळी, मराठ्यांच्या वैभवाचा कळस झाला होता. तो काळ लष्करी पराक्रमाचा व राजकीय सत्तेच्या वाढीचा होता. त्याच वेळी महाभारताची भाषांतरे होऊन राष्ट्रीय भावनेला स्फूर्ति मिळाली, वाङ्मयाच्या स्वरूपात सुधारणा झाली व लेखकवर्गाच्या दृष्टिचे क्षेत्र अधिक विस्तृत झाले. पुढे सवाई माधवरांच्या मृत्यूनंतर मात्र पुण्याच्या दरबारात ख्यालीखुशालीला सुरूवात झाली आणि तेव्हा पासून मराठी वाङ्मयाला उतरती कळा लागली.'' [20]

वाङ्मय हे समाजाचे पूर्ण प्रतिबिंब व्हावे, इतकेच नव्हे तर समाजातील उणीवांचे व त्या सुधारण्याच्या उपायांचे मार्गदर्शक असावे, असा उपदेश महाराजांनी केला आहे. 19व्या शतकातील वाङ्मयाच्या प्रबोधन पर प्रेरणांशी सुसंगत असाच विचार यातून व्यक्त होतो. इ.स.1912 सालच्या एप्रिल महिन्यात बडोदे येथे भरलेल्या गुजराती साहित्यपरिषदेच्या अधिवेशन प्रसंगी त्यांनी सांगितले आहे की, ''आपल्या भोवताली

राहणारे लोक व त्यांचे जीवन हे आपल्या वाङ्मयाचा उत्कृष्ट विषय होण्यासारखे आहे. आपल्या पैकींच्या शेतांत, दुकानात, कारखान्यांत, घरी, दारी वगैरे ठिकाणी वावरणाऱ्या दरेक वर्गाचे व जातीचे जीवन आपण चांगले समजून घेतो काय ? व तसे ते आपण घेत नसलो, तर आपणास ते सुधारता तरी कसे येईल ? म्हणून माझे आपणास असे सांगणे आहे की, आपल्या भोवतालच्या लोकांच्या आयुष्यक्रमाचे आपण निरीक्षण करावे, त्याचे मनन करावे, त्या संबंधाचे लेखन करावे व तो सुधारण्याच्या मार्गाचे शोधन करावे. त्यात पुरूषांप्रमाणे स्त्रियांच्या व दरबारी लोकांप्रमाणेच खेड्यांतील लोकांच्या जीवनाचाहि विचार करावा '' 21

मराठी साहित्यातील मध्यमवर्गीय जीवनचित्रणाची मर्यादितता आणि संकुचितता महाराजांच्या विचारांतून नेहमी प्रकट होताना दिसते. नेमाडे म्हणतात त्या विचारांची बीजरूपे, नेमाड्यांच्या भूमिनिष्ठतेचे तत्त्व, सांस्कृतिक सापेक्षतेचे व विकेन्द्रीकरणाचे तत्त्व सयाजीरावांच्या विचारात दिसते. ''ब्रिटिशांनी अर्थव्यवस्था सोडून बाकीच्या सर्व प्रकारच्या सामाजिक व्यवस्थांचे आधुनिकीकरण करण्याचे जणू व्रतच घेतले होते हे उपयोकिदावादाच्या विरोधाभासाचेच उदाहरण आहे. यामुळे वास्तवाच्या वाङ्मयीन चित्रणात गंभीर स्वरूपाची विकृती निर्माण झाली. अशा वसाहतवादी परिस्थितीत अशी वृत्ती वाढीस लागतेकी, देशी पर्यावरणांनुरूप वाङ्मयीन कृतींच्या संरचनांची निर्मिती न होता, उसनवार संरचनानुसार कलावंतांच्या सामाजिक पर्यावरणांचीच काटछाट होते. अशा वेळी अपल्या अविकसित अर्थव्यवस्थेशी पाश्चिमात्य कल्पना जपून अवास्तव साहित्याची भरभराट होते.'' 22

वाङ्मय हे तरुणपिढीला मार्गदर्शक व्हावे हे धोरण राखून त्या तरूणपिढीपुढे आदर्श म्हणून थोर पुरूषांची चरित्रे ठेवावी व या बाबतीत महाराजांचे मत असेच होते. वरील भाषणांतच त्यांनी सांगितले आहेकी, ''सांप्रतच्या तरूण पिढीला अत्यंत स्फूर्तिदायक होणारे वाङ्मय म्हणजे यशस्वी माणसांची चरित्रे होत. कित्येक पुरूषांनी, त्याचप्रमाणे स्त्रियांनी, आपली आयुष्ये अशा रीतीने घालविली आहेत की, त्यामुळे त्यांच्या कुटुंबांचे त्यांच्या शेजाऱ्यांचे, त्यांच्या समाजाचे व त्यांच्या राष्ट्राचेहि कल्याण झालेले आहे. पुष्कळ वेळा असे स्त्रीपुरुष राज्यकर्ते नसून वाचकांच्या दर्जाचेच सर्व साधारण लोक असतात. या कारणाने हे लोक वाचकांना राजांप्रमाणे अथवा धनवान लोकांप्रमाणे दूरचे वाटत नाहीत व म्हणून त्यांच्या प्रमाणे

चांगली कृत्ये करून आपले आयुष्य उदात्त करण्याची स्फूर्ति त्यांच्या चरित्रांच्या वाचनापासून सामान्य वाचकांस होऊ शकते.'' 23

भौतिक उन्नतीच्या काळात शास्त्रीय ज्ञानाच्या पुस्तकांची व लेखांची लोकांना अत्यंत जरूरी आहे, ही गोष्ट महाराजांनी मुंबईच्या ग्रंथप्रकाश मंडळीने सन् 1930 च्या जानेवारीमध्ये केलेल्या उत्सवाच्या प्रसंगी आपल्या भाषणांत प्रतिपादिली आहे. त्या वेळी ते म्हणाले, '' पुस्तकांच्या अभावी देशी भाषेतून शास्त्रीय विषयांचे शिक्षण देणे अर्थातच अशक्य आहे. यासाठी या बाबतीतील स्वभाषेची परतंत्रता नष्ट करण्यासाठी आपल्यातील शिक्षकांनी व तज्ज्ञांनी आपल्या अभ्यासाच्या विषयांवर देशी भाषेत पुस्तके लिहिली पाहिजेत. प्रथम प्रथम जरी अशी पुस्तके भाषांतरित असली, तरी आपण त्यांवर संतुष्ट न होता पुढे त्या विषयांवर स्वतंत्र ग्रंथ लिहिले पाहिजेत.'' 24

शास्त्रीय विषयांप्रमाणेच शिक्षणशास्त्रावरील पुस्तकांची देशी भाषांतून फार उणीव आहे, ही गोष्ट लोकांच्या नजरेस आणून महाराजांनी या भाषणांत सांगितले आहे, की '' शिक्षण हा संस्कृतीचा पाया असूनही, त्या विषयावर मराठीत फार थोडी पुस्तके असावीत, ही गोष्ट फार आश्चर्यकारक आहे. युरोपांत व अमेरिकेत या पुस्तकांची संख्या हजारोंनी मोजण्यासारखी असून, तिकडील शेकडो मासिकांतून शिक्षण विषयाची चर्चा चालू असते.'' 25

शिक्षणशास्त्रा प्रमाणेच बालवाङ्मयावरही विविध पुस्तकांची जरूरी आहे असे विवेचन या वेळी महाराजांनी केले.

इ.स. 1909 साली बडोद्यात मराठी साहित्यसंमेलन भरले होते आणि लगेच गुजराती साहित्य संमेलन भरले. त्यावेळी त्यांनी आपल्या भाषांतर विषयक प्रयत्नांना व्यवस्थित स्वरूप देण्यासाठी दोन लक्ष रूपयांची रक्कम खानगी खात्यांतून निराळी काढून, तिच्या व्याजाचा विनियोग देशी भाषांत चांगली भाषांतरे करण्यासाठी करावा असा आपला हेतू जाहीर केला. तेव्हांपासून ही भाषांतरशाखा नियमाने काम करू लागली व तिच्यामार्फत 'श्रीसयाजी साहित्यमाले'तून विविध विषयांवर पुस्तके प्रसिद्ध होऊ लागली. या शाखेकडे महाराजांचे निरंतर लक्ष असे. इ.स. 1916 साली काश्मीरांतून पाठविलेल्या एका पत्रात त्यांनी

''चांगल्या पुस्तकांची भाषांतरे करण्याच्या प्रश्नाचा काळजीपूर्वक विचार करून त्या संबंधी काही निश्चित नियम ठरविण्याबद्दल व प्रसिद्ध होणारी पुस्तके सर्वसाधारण लोकांच्या उपयोगी पडतील अशी काळजी घेण्याबद्दल'' [26] आपल्या अधिकाऱ्यांना लिहिले आहे. त्याचप्रमाणे त्यानंतरच्या एका पत्रांत म्हटले आहे की, ''भाषांतराच्या कार्याला मी फार महत्त्व देतो, ही गोष्ट तुम्हांस ठाऊक आहेच. या संबंधाने नियम करून ते शिक्षण खात्याच्या नियमसंग्रहात दाखल करावेत. दर वर्षी निदान 10-15 चांगल्या पुस्तकांची सोप्या व सुंदर भाषेत भाषांतरे व्हावीत, अशी माझी इच्छा आहे.'' [27]

सन् 1917 च्या एका पत्रात ते म्हणतात, ''भाषांतराचे काम जसे जोराने चालावे तसे ते चालत नाही, असे मला वाटते. आपल्या लोकांसाठी चांगली भाषांतरे तयार व्हावीत अशी माझी फार काळापासूनची मनीषा आहे. ती पूर्ण करण्यासाठी तुम्ही अवश्य नेटाचा प्रयत्न करावा.'' [28]

या नंतर सन् 1918 साली ते लिहितात की, ''धर्मविषयक आधुनिक विचार तुलनात्मक दृष्टिने भाषांतर रूपाने लोकांपुढे आणण्याची व्यवस्था जरूर करावी'' [29]

अशा प्रकारे महाराजांची भाषांतरविषयक भूमिका, एतद्देशीयांना आपले स्वत्त्व राखीत आधुनिकता अंगिकारण्यासाठी अत्यंत महत्वाची अशी होती. तुलनात्मक अध्ययनाला आज मौलिकता प्राप्त झालेली असून त्याविषयाचा पायाभूत दृष्टिकोनही महाराजांच्या विचारातून व्यक्त झाला आहे. भाषांतर व तुलनात्मक अध्ययन या संबंधातील ही भूमिका पहाता त्यांचे विचार काळाच्याही पुढे पाहणारे कसे होते, ते प्रत्ययास येते त्यामुळे महाराज या पुस्तक प्रकाशन शाखेला नेहमी टोचीत असत. त्याचा परिणाम म्हणून इ.स. 1936 च्या जून अखेरपर्यंत 'श्रीसयाजी साहित्यमाले'तून जवळ जवळ 250 पुस्तके प्रसिद्ध झाली व या मालेच्याच जोडीने निघणाऱ्या बालज्ञानमालेतून सुमारे 142 पुस्तके प्रसिद्ध झाली. या ग्रंथांचे 1. इतिहास 2. शिक्षण 3. चरित्र 4. विज्ञान 5. वार्ता व 6. धर्म 7. प्रकीर्ण असे सात वर्ग करून त्यांना 'गुच्छ' असे नाव देण्यात आले. यापूर्वी सात आठ वर्षे अगोदरच्या 16-17वर्षात भाषांतर शाखेतर्फे जे कार्य झाले, त्यामुळे महाराजांना पूर्ण संतोष झाला नाही. त्यामुळे या कार्याचे परीक्षण करून त्यांत आढळून येणाऱ्या दोषांची सुधारणा करण्यासाठी व आपली प्रजा व आपले देशबांधव यांच्या करिता पोषक व प्रेरक वाङ्मय निर्माण

करण्यासाठी महाराजांनी एक विशेष समिती नेमली. त्या समितीने केलेल्या निवेदनावरून भाषांतराचे काम पूर्वीहून अधिक चांगल्या रीतीने होण्यासाठी म्हणून एक कायमची समिती नेमून तिच्या कामकाजाचे सूक्ष्म नियम घडविले. या शाखेचे नाव भाषांतर शाखा जरी असले तरी तिच्यातून मूळ पुस्तकांचे स्वतंत्र अनुवाद व अगदी स्वतंत्र ग्रंथरचना करण्यासहि सोय ठेवली आहे व त्यातून काही चांगले ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. 1932 अखेरपर्यंत महाराजांनी या शाखेवर दीड लाख रूपयांहून अधिक खर्च केला होता व त्यातील मराठीच्या वाट्यास सुमारे साठ हजार रूपये खर्च आला असून, साहित्यमाला निघण्यापूर्वीच असा एकंदर खर्च जवळजवळ तीन लाखांपर्यंत जातो. म्हणजे आपल्या साठ वर्षांच्या कारकीर्दीत सुमारे पाच सहा लाख रूपये ग्रंथ निर्मितीसाठी महाराजांनी खर्चिले आहेत.

इतके प्रयत्न करूनही त्यांना यावे तसे यश आले नाही, अशी तक्रार महाराजांनी ग्रंथप्रकाशक मंडळीच्या उत्सवाचे वेळी केली व तसे होण्याचे स्वत:ला वाटणारे कारणही त्यांनी याच वेळी सांगितले ते म्हणाले, ''माझ्या योजनेला अधिक यश आले नाही, याबद्दल मला खेद होतो. या संबंधाने माझे मत असे आहे की, ग्रंथकारांच्या सहकार्याशिवाय अशा बाबतीत सरकारतर्फे केल्या जाणाऱ्या एकांगी प्रयत्नांना यश येणार नाही. आपल्यातील गरीबीमुळे अव्वल दर्जाच्या ग्रंथकारांच्या योग्यतेनुरूप त्यांची संभावना करणे शक्य नसते. परंतु आपण हेहि लक्षात ठेविले पाहिजे की, उत्तम ग्रंथांची निर्मिती केवळ द्रव्यलाभाच्या क्षुद्र दृष्टिने होत नाही. अशाप्रसंगी स्वार्थत्यागाची किंमत फार आहे, ही मी सांगावयास पाहिजे काय?'' [30]

या कारणाप्रमाणेच देशी भाषेत चांगले ग्रंथ निर्माण न होण्याचे दुसरेहि एक कारण त्यांनी यावेळी सांगितले, ते असे की, ''आपल्या देशात ग्रंथकार, प्रकाशक व मुद्रक यांच्या सहकार्याची योजना मुळीच आढळत नाही. त्यामुळे गरीब लेखकांनी लिहिलेले ग्रंथ द्रव्याभावी तसेच पडून राहतात, प्रकाशकांना चांगले लेखक न मिळाल्यामुळे त्यांची कुचंबणा होते व चांगल्या पुस्तकांना आश्रय मिळत नसल्यामुळे मुद्रकांनाहि लहान सहान पुस्तके प्रसिद्ध करावी लागतात. यासाठी या सर्वांच्या सहकारित्वाची एखादी योजना केल्यास पुष्कळ द्रव्य व श्रम यांची बचत होईल.'' [31] वाङ्मयनिर्मितीच्या व भाषावाढीच्या संदर्भात आपले सांस्कृतिक वातावरणही केन्द्रालाच, मग ते अर्थगामी असो अथवा वर्णगामी असो, प्राधान्य देणारे कसे आहे याची विवंचना महाराजांच्या या विचारातून जाणवते.

देशी वाङ्मयाचा उत्कर्ष होण्यासाठी ती भाषा समृद्ध झाली पाहिजे. म्हणजे त्या भाषेत कल्पना, सूक्ष्म भावना व विविध व्यापारांचे आविष्करण करण्याचे सामर्थ्य आले पाहिजे. ज्या समाजात ती भाषा बोलली जाते, त्याचा संबंध त्या त्या व्यवहाराशी व विषयाशी आल्यावरच त्या अर्थाचे प्रयोग व शब्द त्या त्या भाषेत येऊ लागतात. विविध शास्त्र, विविध विषय व व्यवहारांशी देशी भाषेचा संबंध येऊ लागल्यामुळे त्या भाषेत त्या त्या अर्थाचे वाचक शब्द निर्माण करण्याची आवश्यकता निर्माण होऊ लागते. ही उणीव पूर्ण करण्यासंबंधाने दोन पक्ष निर्माण झाले. त्यापैकीच्या एका पक्षाच्या मते अशा कामी परभाषेतील शब्दांची व प्रयोगांची मदत न घेता आपल्या प्राचीन भाषेचीच मदत घ्यावी. या उलट दुसरा पक्ष भाषेच्या बाबतीत असली संकुचित दृष्टी न ठेवता मोकळ्या हाताने परभाषेतून उसनवारी करण्यास सांगतो. या पैकींच्या दुसऱ्या पक्षाचा महाराजांनी पुरस्कार केला आहे. या संबंधाने त्यांनी आपले विचार प्रदर्शित केले आहेत की, ''कोणतीहि भाषा पुष्ट व्हावयाची असेल, तर ती नेहमी वर्धिष्णु असली पाहिजे. भाषेच्या वाढीला परभाषेतील उसनवारीने फार मदत होते. इंग्रजी भाषा सांप्रत जगातील सर्व भाषेत समृद्ध असल्याचे कारण हेच आहे की, तिच्यात इतर अनेक भाषांचे मिश्रण झाले आहे. इंग्लंडावरील नॉर्मन लोकांनी केलेल्या स्वारीमुळे त्या देशाच्या मूळच्या अँग्लो सॅक्सन भाषेत फ्रेंच भाषेचे मिश्रण झाले. त्याच्या योगाने चॉसरने लिहिलेली भाषा तयार झाली. त्याचप्रमाणे हिंदी भाषेत फारसी संस्कृतिदर्शक शब्दांचे मिश्रण झाल्यामुळे त्या भाषेचे सामर्थ्य वाढले आहे.'' [32]

अशा रीतीने परभाषेतील शब्दांची भर आपल्या भाषेत करता येण्यासाठी एकच अर्थ अथवा कल्पना व्यक्त करणाऱ्या अनेक भाषेंतील शब्दांचा एकत्र संग्रह केलेला असणे फार अवश्य आहे, हे जाणून महाराजांनी 'सयाजी शासनशब्दकल्पतरु' या नावाचा आठ भाषांतील समानार्थक शब्दांचा संग्रह केला आहे. अनेक भाषांना सारखेच वापरता येतील असे शब्द वरील कोशांत सुचविले आहेत.

अशा रीतीने महाराजांनी देशी भाषेतील ग्रंथसमृद्धीला आपल्या खात्यामार्फत उत्तेजन दिले, इतकेच नव्हे तर वाङ्मयसंवर्धनाच्या हरेक प्रयत्नाला मदत करून व वाङ्मयाच्या परिषदांना स्वतः हजर राहून उत्तेजन दिले आहे. इ.स. 1912 साली त्यांनी आपल्या राज्यात सरकारी खर्चाने गुजराती साहित्य संमेलन

भरविले. त्यानंतर 1921 साली बडोद्यास मराठी साहित्य भाषेचे चतुर्थ साहित्यसंमेलनाचे दहावे अधिवेशन भरविण्यासही त्यांनी फार मदत केली. हा समारंभ बडोदे येथील इंदुमती महालात मोठ्या थाटाने साजरा करण्यात आला. त्या प्रसंगी सुप्रसिद्ध साहित्यसेवक रा. न. चिं. केळकर यांची अध्यक्षस्थानी योजना करण्यात आली. तसेच द्वारकेचे शारदापीठाचे शंकराचार्य उपस्थित होते. हे संमेलन प्रथम ज्या दिवशी सुरु होण्याचे जाहीर करण्यात आले होते. त्याच दिवशी महाराजांचा परगावी जाण्याचा कार्यक्रम निश्चित झाला होता व या कार्यक्रमाची अगाऊ माहिती नसल्यामुळे संमेलनाची सुरुवात त्या दिवशीच करण्याचे व्यवस्थापक मंडळाने ठरविले होते. परंतु महाराजांच्या पूर्वनियोजित कार्यक्रमामुळे सुरुवातीसच ते गैरहजर राहण्याचा प्रसंग येऊ नये म्हणून संमेलनाच्या चालकांनी महाराजांजवळ आपली भीती निवेदन केली, त्यावेळी संमेलनाच्या सुरूवातीची तारीख एक दिवस अगाऊ आणण्याची सोय करण्यात आली. त्याप्रमाणे 26 नोव्हेंबर 1921 रोजी अधिवेशनाची सुरुवात झाली. या अधिवेशनाचे उद्घाटन करताना महाराज म्हणाले,

''या प्रसंगास मी हजर रहावे म्हणून संमेलनाची वेळ आपण माझ्या सोयीची ठरविली याबद्दल मी आपला आभारी आहे.'' असे सांगून, त्यानंतर सांप्रत काळी उपयुक्त ग्रंथ निर्माण करण्याची निकड केवढी आहे याचे त्यांनी विवेचन केले व या कामी लोकांनी स्वार्थत्यागपूर्वक सहाय्य करण्याची जरुरी आहे असे सांगितले. तसेच चांगले ग्रंथ स्वस्त किंमतीत देण्याची आवश्यकता असल्याचेही त्यांनी प्रतिपादन केले. निरनिराळ्या भाषांच्या साहित्यपरिषदांमधे देवघेव करण्याची जरुरी असल्याने त्यांनी विवेचन केले व मागे उल्लेख केल्याप्रमाणे लेखक, मुद्रक, प्रकाशक व धनिक यांचे सहकार्य उत्पन्न करण्याची विशिष्ट योजना करण्याच्या जरुरीवर भर दिला. अखेर त्यांनी

'जितुकें आपणांस ठावें । तितुकें हळू हळू शिकवावें ।
शहाणे करोनी सोडावें। सकल जन।' [33]

या समर्थ रामदासांच्या शब्दांनी आपल्या भाषणाचा समारोप केला.

इ.स. 1932 मध्ये बडोदे येथे भरलेल्या दुसऱ्या वाङ्मय परिषदेच्या प्रसंगीहि महाराजांनी स्वतः हजर राहून तिच्या उद्घाटनाचे भाषण केले. त्यावेळी ''लोकांची सांस्कृतिक उन्नति घडवून आणून हे जग

स्वतःच्या व इतरांच्या राहण्यास पात्र करण्याच्या साधनात वाङ्मयाचे स्थान फार श्रेष्ठ आहे व म्हणून आजच्या या परिषदेला हजर राहण्याची संधि मिळाल्याने मला फार आनंद होत आहे.''[34] अशी प्रस्तावना करुन, वाङ्मयाच्या स्वरूपाची चिकित्सा केली.

त्या संबंधाने, ''वाङ्मयाचा चांगलेपणा हा प्रत्येकाच्या रुचीवर अवलंबून असतो. या त्याच्या रुचीचा विग्रह केला, म्हणजे त्यांतून काही मूलतत्त्वे निष्पन्न होतात, त्या तत्त्वांवर उलटसुलट चर्चा होण्याने टीकाशास्त्राचा जन्म होतो व त्याची प्रतिक्रिया पुन्हा वाङ्मयावर होऊन त्याचे स्वरुप बदलून व पहिल्याहून अधिक चांगले वाङ्मय निर्माण होते. प्राचीन काळी मुद्रणकलेच्या अभावी लिखित वाङ्मयाचा प्रसार फार थोडा होत असे, परंतु त्यानंतर तो झपाट्याने वाढल्यामुळे लोकांना वाचनाची सवय लागली. अर्थात् ग्रंथप्रकाशन हे लोकांच्या अभिरुचीवर अवलंबून राहिल्याने ग्रंथकारांवर लोकमताचा दाब पडू लागला. त्याचे परिणाम इष्ट व अनिष्ट असे दोन्ही प्रकारचे होऊ लागले व त्यामुळे विद्वान वाचकांच्या अभिरुचीला पटण्यासारखे चांगले ग्रंथ ज्याप्रमाणें निर्माण होऊ लागले, त्याचप्रमाणे कनिष्ठ प्रतीच्या लोकांसाठी शृंगाराचे, गुन्हांचे व अपकृत्यांचे भडक रंगात वर्णन करणारे लिखाणहि प्रसिद्ध होऊ लागले. असे होणे काही अंशी अपरिहार्य आहे, तथापि हलक्या दर्जाचे वाङ्मय प्रसिद्ध होण्याला प्रतिबंध करण्याचे मुख्य साधन म्हणजे उच्च शिक्षणाने लोकांची अभिरुचि श्रेष्ठ करणे हेच आहे.''[35] अशा अर्थाचे समर्पक विवेचन त्यांनी केले.

इ.स. 1933 साली बडोद्यास भरलेल्या तिसऱ्या वाङ्मय परिषदेलाही महाराजांनी स्वतः येऊन या कार्याविषयीचे आपले प्रेम व्यक्त केले. त्यानंतर थोड्याच दिवसांनी कोल्हापूरचे साहित्य संमेलन भरले. त्या प्रसंगी अध्यक्षस्थानी महाराजांची योजना झाली असतानाही महाराज तेथे उपस्थित होऊ शकले नाहीत. तथापि त्यांनी आपल्या भाषणाच्या अखेरीस सुविचार, व सद्भावना यांना पोषक असे वाङ्मय प्रसिद्ध करण्याबद्दल, अर्थशास्त्र, नीतिशास्त्र, विज्ञानशास्त्र, स्थापत्य, चित्रकला वगैरे विषयांवरील अभिज्ञ ग्रंथकारांच्या पुस्तकांची मराठीत भाषांतरे करविण्याबद्दल, परभाषेतील लहान लहान संदर्भ ग्रंथांवर 'देशीकार लेणे' चढवून अथवा त्या धर्तीवर स्वतंत्र ग्रंथ प्रसिद्ध करुन विद्यापीठात जाण्याचे भाग्य न मिळालेल्यांना तसे शिक्षण मिळण्याची सोय करून देण्याबद्दल, लेखकाने अवघड भाषेत न लिहिता प्रत्येकास समजावे अशी

भावना मनात ठेऊन साध्या भाषेत लिहिण्याबद्दल, जुन्या उत्तम ग्रंथांच्या नवीन आवृत्त्या काढण्याबद्दल, वगैरे अनेक उपयुक्त सूचना केल्या. या कामी महाराजांनी केलेल्या परिश्रमाच्या अनुभवाचा पाठिंबा त्यांना असल्यामुळे त्यांचा हा उपदेश 'परोपदेशे पाण्डित्यं' अशा स्वरूपाचा नसून तो 'आधी केले मग सांगितले' अशा अधिकाराचा झाला.

साहित्य संमेलने व परिषद ज्या वाङ्मयसंस्थांमार्फत भरविण्यात येतात, त्यांचे स्वरुप परिस्थितीच्या अनुरोधाने जरी प्रादेशिक असणे अपरिहार्य असले तरी, त्या सर्वांची दरेक भाषेपुरती तरी एक मध्यवर्ती संस्था असावी व तिचा आदर्श फ्रेंच ॲकेडमी असावा असा आपला अभिप्राय महाराजांनी दर्शविला. तथापि त्यांच्या मते फ्रेंच ॲकेडमी या संस्थेचे धोरण पुराणप्रिय असून मौलिक विचार प्रकट करण्यापेक्षा सुंदर लेखन व भाषाशैली यांची वाढ करण्याकडेच ते अधिक आहे व म्हणून दोष टाळण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे, अशी सूचना त्यांनी दिली.

मराठी भाषेप्रमाणेच गुजराती भाषेच्या अभिवृद्धीकडेही त्यांनी लक्ष दिले आहे. किंबहुना त्यांच्या राज्यात गुजराती भाषा बोलणारी प्रजा अधिक असल्यामुळे, वाङ्मय संवर्धनासाठी खर्च होणाऱ्या खर्चाचा मुख्य भाग गुजरातीकडेच जातो. त्याचप्रमाणे प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांत त्याच मानाने गुजरातीचे प्रमाण अधिक असते. मराठी व गुजराती या भाषांना अशा प्रकारे उत्तेजन दिले तरी हिंदुस्थानातील सर्व देशी भाषेत हिंदी हीच एक भाषा सर्व हिंदुस्तानची राष्ट्रभाषा होण्यास लायक आहे असा त्यांचा ठाम ग्रह असल्यामुळे त्या भाषेच्या उन्नतीसाठी त्यांची तीव्र इच्छा असे. एक भाषा व एक लिपि असल्याशिवाय सर्व राष्ट्रात ऐक्याची भावना निर्माण होणे फार कठिण आहे असे त्यांनी प्रतिपादन केले. 19 व्या शतकातील राष्ट्रैक्य विचारातून याचा जन्म झाला. इ.स. 1912 सालच्या गुजराती साहित्यपरिषदेत त्यांनी त्याची चर्चा केली आहे. तसेच 1915 सालच्या संस्कृत संमेलनाच्या वेळी आपल्या आध्यात्मिक उन्नतीसाठी संस्कृत विद्येच्या प्रसाराची आवश्यकताही त्यांनी सांगितली.

महाराजांनी संस्कृत विद्येला उत्तेजन देण्यासाठी अनेक रीतींनी प्रयत्न केले आहेत. या प्रयत्नांत संस्कृत ग्रंथांची भाषांतरे, ओरिएन्टल इन्स्टिट्यूटची स्थापना, संस्कृत हस्तलिखितांचा संग्रह, जैनभांडारातील

ग्रंथांची सूची, गायकवाड ओरिएन्टल सीरीजमधील ग्रंथांचे प्रकाशन, संस्कृत राजकीय पाठशाळेची स्थापना, संस्कृत भाषेची संमेलने, त्या भाषेतील व विषयांवरील व्याख्याने, संस्कृत पंडितांचे सन्मान, व त्यांना पारितोषिकांचे प्रदान, श्रावणमासदक्षिणा, इ. अनेक प्रकारांचा अंतर्भाव झालेला आहे. महाराजांच्या कारकीर्दीच्या पूर्व व मध्यभागांत संस्कृत ग्रंथाच्या मुद्रणाकडे व भाषांतराकडेच विशेष लक्ष पुरविले होते. सन 1915 सालच्या मार्च महिन्यात महाराजांनी बडोधास एक संस्कृत संमेलन भरविले, त्या वेळी त्याचा उदेश त्यांनी आपल्या भाषणात सांगितला आहे,

''हे संमेलन या राज्यांत संस्कृत विद्येचा उद्धार करण्याचा हेतूने भरविले आहे'' [36] यानंतर याच भाषणात संस्कृत विद्येच्या अभ्यासाची पुढील दिशा कशी असावी हें दर्शवितांना ते म्हणाले की,

''सांप्रत परिस्थिती बदलत आहे, अशा वेळी नुसता जुना कित्ता गिरविणे उपयोगी नाही. पाश्चात्य देशांतील तुलनात्मक व गुणदोषविवेचक बुद्धि स्वीकारून आपण त्या भाषेचे व विषयांचे अध्ययन इत उत्तर केलेले पाहिजे'' [37] या संमेलनासाठी महाभागवत कुर्तकोटी-करवीर मठाचे शंकराचार्य यांना बोलवण्यात आले होते. सदर संमेलनात तीन दिवस चर्चा होऊन बडोद्यास संस्कृत पाठशाला स्थापन व्हावी, असा ठराव पास करण्यात आला. त्यानुसार 'संस्कृत राजकीय विद्यालय' या नावाने बडोद्यास ही पाठशाला स्थापन करण्यात आली. त्यात प्राचीन संस्कृत अध्ययनाच्या सर्व शाखा उघडून, त्यांचा अभ्यासक्रम तीन वर्षापासून बारा वर्षापर्यंतचा ठरविण्यात आला. या पाठशाळेचे शिक्षण मोफत केले असून, हुषार विद्यार्थांसाठी दरमहा आठ ते बारा रूपयेपर्यतच्या पन्नास शिष्यवृत्त्या ठेवण्यात आल्या. शिवाय या विद्यालयातील विद्यार्थ्यांना इंग्रजी शिक्षण देण्याची खास व्यवस्था करण्यात आली. त्याचा हेतू हा की येथे संस्कृत विद्या शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना तौलनिक अभ्यासक्रम करणे सुलभ व्हावे.

इ.स. 1927 साली त्यांनी बडोद्यास ओरिएंटल इन्स्टिट्यूटची स्थापना केली. या संस्थेचा उद्देश संग्रहात्मक व संशोधनात्मक असा दुहेरी आहे. आरंभी येथील विठ्ठल मंदिरातील दोन तीनशे हस्तलिखितांचा संग्रह या संस्थेच्या स्वाधीन करण्यात आला. त्यानंतर मद्रासेकडील श्री. अनंतकृष्ण शास्त्री या विद्वान पंडितांची ग्रंथसंपादनाच्या कामी नेमणूक करण्यात आली. त्यांना कित्येक वर्षे सर्व हिंदुस्तानभर ग्रंथ

संपादनासाठी पाठविण्यात आले. या संग्रहात भूर्जपत्रांवर, ताडपत्रांवर, कागदांवर, वस्त्रांवर वगैरे निरनिराळ्या साधनांवर लिहिलेले ग्रंथ असून, अनेक प्राचीन ताम्रपटांचाहि भरणा आहे. या संस्थेचा दुसरा उद्देश संशोधनाचा आहे व त्या दृष्टीने वरील प्राचीन हस्तलिखितांपैकीचे महत्त्वाचे ग्रंथ संशोधित करून, त्यांचे प्रकाशन करण्यासाठी म्हणून 'गायकवाड ओरिएन्टल सीरीज' या मालेची योजना करण्यात आली. या संस्थेच्या डायरेक्टरच्या जागी डॉ. भट्टाचार्य यांची योजना करण्यात आली.

इ.स.1927 च्या डिसेंबर महिन्यांत मुंबईस तत्त्वज्ञान परिषदेचें अधिवेशन भरविण्यात आले होते, त्याचा आरंभ करण्याचा सन्मान महाराजांना देण्यात आला होता. त्या प्रसंगी त्यांनी केलेल्या भाषणात संस्कृतविद्येच्या अभिवृद्धीची एक नवीन दिशा दर्शविण्यात आली. या भाषणात महाराज म्हणाले, ''सांप्रत काली हिंदुस्थानांत तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाच्या दृष्टीने पाहता भारतीय व पाश्चात्य अशा दोन्ही पद्धतींचे ज्ञान करून घेऊन त्यांतील उत्तम भागांचा संग्रह करणारी विचारप्रणालिका आपणांस हवी आहे. या नवीन दृष्टिने आपल्या सामाजिक व नैतिक प्रश्नांचे परिक्षण करून तत्संबंधीचे सिद्धांत पुन्हा अधिकृत ग्रंथरुपाने मांडणे उपयुक्त होईल. उदा. अलीकडील काळात भारतीय नीतिशास्त्राचे ऐतिहासिक दृष्ट्या विवेचन करणारी कांही पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत, परंतु त्या शास्त्रातील सिद्धांताचा पद्धतशीर व विवेचक अभ्यास करून तो आपल्यापुढे मांडणारे ग्रंथ अजून निर्माण व्हावयाचे आहेत. तीच गोष्ट तत्त्वज्ञानाची आहे. तथापि सांप्रत काली या विषयांत प्रो. रानडे, दासगुप्त, राधाकृष्णन्, यांच्यासारख्या हिंदी गृहस्थांचे महत्त्वाचे ग्रंथ प्रसिद्ध होत आहेत, ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे.'' [38]

आपल्या संस्थानात विद्वान लोकांचा सन्मान करण्याची योजना सुद्धा महाराजांनी केली होती. प्रो. राधाकुमुद मुकर्जी, श्री. चिंतामणराव वैद्य अशा सारख्या विद्वान लेखकांचा महाराजांनी सन्मान करून त्यांना पदव्या व पदके अर्पण केली. असा मान केवळ संस्कृत पंडितांचाच केलेला नसून, सर्व प्रकारच्या विद्वानांचा करण्यात आला. डॉ. रविन्द्रनाथ टागोर, श्री. कै. हरगोविंददास कांटावाला, श्री. चंद्रशेखर शि. गोऱ्हे, यांसारख्या अनेक भाषांतील लोकांचाही सन्मान करण्यात आला. इ.स. 1930 च्या फेब्रुवारी महिन्यात महाराजांनी श्री. चिंतामणराव वैद्य व श्री. दामोदर सावळांराम यंदे यांचा दरबारात सन्मान केला, त्या वेळी

त्यांनी केलेल्या भाषणात सांगितले की, " सन् 1925 साली वाङ्मय, शास्त्रे व ललितकला यांविषयी विशेष कर्तबगारी करणाऱ्या गृहस्थांचे चीज त्यांना पदके व रोख रकमा देऊन करण्याची योजना मी केली आहे. आज या ठिकाणी एक ग्रंथकार व एक प्रकाशक यांचा सन्मान करण्यांत येत आहे. वाङ्मय कलेची ही दोन अंगे निरंतर माझ्या जिव्हाळ्याची असल्यामुळे मला हे कार्य करतांना फार आनंद होत आहे." [39] यानंतर प्रसिद्ध साहित्यकारांचा सन्मान करण्याची ही मूळची योजना वाढवून तिला अधिक मोठे व नियतकालिक रूप देण्याची व्यवस्था महाराजांनी आखली. या योजनेनुसार दरवर्षी मार्च महिन्यात त्यांच्या वाढदिवसाच्या सप्ताहाचे सुमारास आळी पाळीने गुजराती व मराठी या दोन भाषांतील पांच पांच प्रसिद्ध साहित्यसेवकांना बडोद्यास बोलावून त्यांचा सन्मान करावा व त्यापैकींच्या दरेकाचे आपआपल्या आवडीच्या व व्यासंगाच्या विषयांवर व्याख्यान करवावे, असे निश्चत करण्यात आले. या प्रमाणे इ.स.1933 साली पाच प्रसिद्ध गुजराती भाषेतील साहित्यसेवकांचा सन्मान करून त्यांची व्याख्याने करविण्यात आली व इ.स. 1936 साली पाच मराठी साहित्यसेवकांच्या व्याख्यानांचीही एक माला गुंफण्यात आली. ही व्याख्यानें नामशेष न व्हावी यासाठी ती सरकारमार्फत छापून प्रसिद्ध करविण्याची व्यवस्थाही करण्यात आली. अशा रीतीने विद्वान साहित्यकारांच्या ज्ञानाचा लाभ इतरांना मिळावा व त्याचबरोबर त्यांच्या विद्वतेचे व त्यांच्या परिश्रमांचे चीज केले जावे असे या योजनेचे दुहेरी स्वरूप होते.

श्री सयाजी गौरवग्रंथाच्या अखेरच्या आठवणींच्या भागांत महाराजांबरोबर अनेक वर्ष काढलेल्या रा. गोविंदराव सरदेसाई यांच्या आठवणी दिल्या आहेत. त्यात महाराजांच्या विद्याभिरूचीचे वर्णन केले असून त्यांना निर्भेळ आनंद कशापासून होत असेल तर तो उत्तम पुस्तकांच्या संगतीनेच होय, असे दर्शविले आहे.

## इ) श्री सयाजी महाराजांच्या ग्रंथविषयक योजना

बडोदे राज्य पूर्वी गुजरात सौराष्ट्रमध्ये विखुरलेले होते. गुजरातमध्ये त्याचा नवसारी प्रांत आणि बडोदे तसेच महेसाणा प्रांत आलेला होता. आणि सौराष्ट्रात त्याचा अमरेली आणि ओखामंडळ प्रांत आलेला होता. साहित्य प्रवृत्तिच्या दृष्टिने पाहिले असता बडोदे राज्यात इ.स. 1723 पासून इ.स. 1875 या दीडशे

वर्षात अनेक विविध भाषांतील साहित्यकार होऊन गेले. त्यामध्ये बडोद्याचे बापुसाहेब गायकवाड, देहगावचा हीमो भगत, नवसारीचा वल्लभ रघुराम, बडोद्याचा हरिभट्ट, कलोलचा सुरभट्ट, वडनगरची कृष्णाबाई, गोठड्याचा धीरो भगत, डभोईची दिवाळीबाई, नवसारीचा नानाभाई मजमुदार, चाणोद-डभोईचा दयाराम, मासरचा गिरिधर गरबडदास, पाटणचा दिपविजय, मलातजचा छोटम, विजापुरचा डुंगर बारोट, सिद्धपुरचा कांतिविजय, विजापुरचा बुद्धिसागरसुरि, सिद्धपुरचा विजय वल्लभसूरि तसेच सिद्धपुरचा हंसविजय इ. विशेष नोंदपात्र आहेत. इ.स. 1723 आधी सुद्धा बडोदे राज्यात नसलेले परंतु त्यानंतर बडोदे राज्यात विलिन झालेल्या वेगवेगळ्या गावातून अनेक साहित्यिक आपले लेखन कार्य करीत होते. अशा व्यक्तिंमध्ये बडोद्याचा वीरजी, पाटणचा वल्लभ, कारवणचा अजरामर, सिद्धपूरचा दामोदराश्रम, वडनगरची कृष्णाबाई, पाटणचा विष्णुदास, गणदेवीचा कीकु वसही, बडोद्याचा नरहरी, व्याराचा गोपालदास आणि पाटणची मंगळीबाई, त्याचबरोबर पाटणचा अभयदेवसूरि, पाटणचा वादीदेवसूरि, हेमचंद्रसूरि, डभोईचा मुनिचंद्रसूरि, सोमप्रभ, सिद्धपाल, अंबदेवसूरि, तरुणप्रभुसूरि, सिद्धपाल, सिद्धपूरचा असाईत राजाराम, पाटणचा सोमसुंदरसूरि, भालण, सिद्धपूरचा उदयधर्म, विसनगरचा पद्मनाभ, पाटणचा लावण्यसमय, सिद्धपूरचा भीम, समरचंद्र(सिंह), बडोद्याचा नाकर विकाजी, भीमजी ऋषि, प्रेमानंद, रुपालचा गोपालदास, उंझाचा देवगुपसूरि, साधुकीर्ति पाटणचा पूंजाऋषि, ललितप्रभुसूरि, सोजित्र्याचा देविदास, पीजचा नरभेराम, सिद्धपुरचा कल्याण, कडीचा लालविजय, कन्होडुचा यशोविजय, बडोद्याचा द्वारकादास, हरिदास, राधाबाई, गोडीदास, पाटणचा भाव प्रभुसूरि, द्वारकेचा मुकुंद, सिद्धपुरचा विश्वनाथ जानी, पाटणचा जिनहर्ष, मधूसुदन व्यास, डभोईचा रत्नेश्वर मेघजी, वाघोडियाचा निरांत, पाटणचा श्रीदेव वगैरेचा उल्लेख होतो. ह्या सर्वच व्यक्तिंचा साहित्याच्या क्षेत्रात थोडा बहुत वाटा आहे. [40]

महाराजांनी विद्याभिरूची इतकी दांडगी होती की त्यांनी विद्याप्रसाराच्या सत्कार्यात आपले तन, मन, धन खर्च केले. जगातील उत्कृष्ट वाङ्मय आपल्या पूर्ण परिचयाचे करून घेऊन त्याचा लाभ आपल्या देशातील बांधवांना व्हावा ह्यासाठी ते सतत कार्यरत राहिले.

महाराज सयाजीराव प्रथम 1882 साली विलायतेत गेले होते व त्यावेळेपासूनच तिकडील ज्या

काही शिकण्यासारख्या समाजउपयोगी गोष्टी असतील त्या आपल्या राज्यात आणण्याचा सतत प्रयत्न ते करीत असत. पाश्चात्यांचे पाकशास्त्र पाहून त्यांनी आपल्याकडून दोन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ति देऊन विलायतेत पाठविले आणि ते परत आपल्यानंतर खाशा मुदपाकाची व्यवस्था त्यांच्याकडे सोपविली, त्यांनंतर पुढे 'पाकशास्त्र ग्रंथमाला' काढून पाश्चिमात्य पाकशास्त्र (भाग-3) व सूपशास्त्र (मद्रासी, मुसलमानी, इंग्रजी, तंजावरी इ पद्धतीचे अंक 4) हे मोठे ग्रंथ व 'भोजन दर्पण' (1897), 'भोजन दर्पणकला' (1909), 'पाकशिक्षण', क्रमिक पुस्तके 1-3 (1908), 'सयाजी पाकरत्नाकर' (1917), 'महाराष्ट्रीय स्वयंपाक' 'पदार्थवार लागणाऱ्या जिन्नसांचे प्रमाणाचे पुस्तके' (भा-3, 1928), पदार्थवार आकाराचे पुस्तक (1914) इ. अनेक पाकशास्त्रीय ग्रंथ लिहवून घेतले.

या शिवाय खालील प्रमाणे ग्रंथयोजना सुरू केलेल्या दिसतात.

1. दक्षिणाफंड : 'दानचंद्रिका' (शं. मो. रानडे), 'आचार मयूख' (भिकाचार्य), 'प्रायाश्चित मयूख' (ऐंनापुरे शास्त्री) यांसारखी पुस्तके बाहेर पडली. या योजनेतून निर्माण झाली

2. ग्रंथमालिकांचा उदय-(योजना) - शंकर मोरो रानडे, गो. स. सरदेसाई (रियासतकार) व प्रसिद्ध शास्त्रज्ञ प्रो. गज्जर यांच्या मौलिक साहाय्याने महाराजांनी अनेक ग्रंथ विषयक योजना अमलात आणल्या. इ.स. 1909 मध्ये बडोद्यास जे मराठी साहित्य संमेलन भरले व नंतर लगेच जे गुजराती साहित्य संमेलन भरले त्या प्रसंगी महाराजांनी मराठी, गुजराती, हिंदी या भाषांतून स्वतंत्र, रूपातरित, भाषांतरित ग्रंथांसाठी दोन लाख रूपयांची ठेव राखून त्याच्या व्याजातून 'श्री सयाजी साहित्यमाला' व 'श्री सयाजी बालज्ञानमाला' निर्माण करावयाच्या योजनांचा मनोदय प्रगट झाला. पैकी श्री सयाजीसाहित्यमालेत जवळ जवळ 300 च्या वर पुस्तके असून इतिहास, शिक्षण, चरित्र, विज्ञान, प्रकीर्ण, वार्ता, धर्म, केवळ पुष्प असे त्यांचे आठ वर्ग आहेत. 'रियासतीचे तीन भाग' (गो. स. सरदेसाई), 'सुधारणा आणि प्रगती' (दा. ना. आपटे), 'दीघनिकाय' (चिं. वै. राजवाडे), 'सनईवादन पाठमाला' (गणपतराव पि. वसईकर), 'संस्कृत वाङ्मयाचा इतिहास' (सी. वा. पेंडसे), 'मुंबई इलाख्यातील जाती' (गोविंद म. कालेलकर), 'तत्त्वज्ञानातील कूटप्रश्न' (दा. ना. आपटे),

'प्रजननशास्त्र' (ग. ना. मोडक), 'एका शिपायाचे आत्मवृत्त' (जनरल नानासाहेब शिंदे) यांसारख्या काही पुस्तकांच्या नावावरून सयाजी महाराजांच्या साहित्य संकल्पनेनुसार ग्रंथनिर्मितीचे स्वरूप दिसते. 'सयाजी बालज्ञानमाले'तील 'बालबाबर', 'विल्यम् एबर्ट ग्लॅडस्टोन' यांसारखी माहितीपर पुस्तके दिसतात. संस्कारक्षमता व सुलभ शब्दातून दिलेले ज्ञान यांतून त्याची निर्मिती झालेली दिसते.

3. शास्त्रीय ग्रंथमाला : पाश्चात्य विद्या देशीभाषेत आणून समाजाच्या सर्व स्तरातील लोकांना ज्ञानसंपन्न करण्याच्या प्रेरणेने प्रो. गज्जर यांनी सुचविल्याप्रमाणे 'श्री सयाजी ज्ञानमंजुषा', 'श्री सयाजी लघुमंजुषा', या शास्त्रीय विषयांवरील ग्रंथमाला सुरू केल्या. 'रेखात्मक यथादर्शन' (Linear Perspecture)-ले. ग. भा. वैद्य, 'न्यायशास्त्र' (मो. के. दामले), 'व्यापारी भूगोल', 'धनुर्धारी' यांसारखी थोडी पुस्तके यातून बाहेर पडली. पण शास्त्रीय विषयांतील पारंगतता व परिभाषिक शब्दांची उणीव यामुळे या मालेत ग्रंथनिर्मिती झाली नाही, तरी आज शास्त्रीय विषयावरील ग्रंथनिर्मिती पाहता, त्याचा विजारंभ अशा तऱ्हेच्या प्रयत्नात आहे असे म्हणावे लागेत.

4. क्रीडा ग्रंथमाला - जुने खेळ नामशेष न होता त्याच बरोबर नव्या पाश्चात्य खेळाचीही माहिती असावी या महनीय दृष्टीने ही माला सुरू करण्यात आली. 'मराठी खेळांचे पुस्तक' हे कालेलकरांनी लिहिलेले पुस्तक आज दुर्मिळ आहे. रा. स. आठवले, व गो. स. सरदेसाई यांनी नऊ, दहा पुस्तके प्रकाशित केल्याचा उल्लेख मिळतो.

5. या शिवाय 'महाराष्ट्र ग्रंथमाला', 'जमनाबाई स्मारक ग्रंथमाला', इ. अनेक माला प्रसिद्ध झाल्या असून त्यांचे दस्तवैजीकरण होणे आवश्यक आहे. स्वतः सयाजीरावांनी इंग्रजी लिहिलेल्या पुस्तकाचा 'रोमी कैसरकीचा उदय व पूर्ण अस्त' हे पुस्तक असून 'राजाराम रा. भागवत' यांनी ते मराठीत रूपांतरित केले आहे. 'मराठी दृष्टिने जगाच्या इतिहासाची साधने' व 'वाचणारात इशारत' ही त्याची प्रस्तावना अत्यंत मौलिक व संदर्भयुक्त आहे.

ग्रंथनिर्मिती विषयक योजनांबरोबर शब्दकोशांना साहाय्य, ग्रंथास पारितोषिके देणे, सरकारी खर्चाने ग्रंथछपाई करवून छपाई खर्चाइतक्या प्रती विकत घेणे, देणग्या देणे, यांसारख्या अनेक उपायांचा अवलंब करीत ग्रंथप्रसार हे त्यांनी आपले आद्यकर्तव्य मानले.

अशा प्रकारे अनेक उपाय योजनांनी ग्रंथोत्तेजनाचे कार्य महाराजांनी आपल्या संस्थानात केले.त्यांनी केलेल्या उपाय योजनांचे प्रकार खालील प्रमाणे आहेत.

1. पारितोषिक देऊन ग्रंथ तयार करावयाचा व मग सरकारी खर्चाने तो छापावयाचा.

2. राज्यातील नोकरवर्गाकडून स्वत:चे काम म्हणून ग्रंथ तयार करवावयाचा व मग तो सरकारी खर्चाने छापवयाचा. शं. मो. रानडे, सरदेसाई, गोविंदभाई देसाई यांनी याच प्रकारे ग्रंथ तयार केले.

3. पगारी ग्रंथकार ठेऊन खास देखरेखीखाली ग्रंथ तयार करवावयाचा. उदा. सयाजी ज्ञानमंजूषेतील ग्रंथ, संस्कृत संशोधक खाते स्थापून काही ग्रंथांची भाषांतरे करविली.

4. ग्रंथकाराला पारितोषिक देऊन ग्रंथ तयार करवावयाचे व त्याच्याकडूनच तो छापवून घेऊन त्याच्या काही (50) प्रती सरकारने घ्यावयाच्या. ज्ञानमंजुषा बंद पडल्यावर पदार्थविज्ञान, कृषिकर्म इ. ग्रंथ असे छापवले.

5. ग्रंथकाराकडून ग्रंथ तयार करवून छापावयाचा व त्याच्या 1/2 प्रती पारितोषिक म्हणून त्या ग्रंथकारास द्यावयाच्या. उदा. अबलोन्नति लेखमाला, संसार मार्गोपदेशिका, इ.

6. ग्रंथकाराकडून ग्रंथ तयार करवून त्याच्या कडूनच तो छापावयाचा व छपाईचा जेवढा खर्च झाला असेल तितक्या किंमतीच्या प्रती सरकारने विकत घ्यावयाच्या. स्त्रीभूषण, कन्याभूषण, उपनयन विधिसार, इ. ग्रंथ असे तयार झाले.

7. ग्रंथ तयार करून छापण्यासाठी उचलून रक्कम द्यावयाची व ती बद्दल काही ठराविक प्रती सरकारने घ्यावयाच्या. गुजराती काव्यमाला ग्रंथ (35) अशा रीतीने तयार झाले. या साठी 16,000 रू. मंजूर झाले होते.

8. विशिष्ट विषयावरची पुस्तके सरकारी खर्चाने छापून, त्याच्या काही प्रती ठेवून बाकीच्या ग्रंथकारास द्यावयाच्या. प्रौ. मौलाबक्ष, मूर्तुजाखां, मनोहर यांची गायनावरील पुस्तके संगीत पारिजात, व संगीत रत्नाकर यांची भाषांतरे या प्रकारे निघाली.

9. ग्रंथांच्या उत्तेजनासाठी देणग्या द्यावयाच्या. महाराष्ट्र शब्दकोश, पेशवे दप्तर, वाडांच्या रोजनिशा इ.

10. महाराजांना नजर केलेल्या ग्रंथांना बक्षीसे द्यावयाची.

श्री सयाजीराव महाराजांनी इ.स. 1931 साली देशी भाषेत भाषांतर करण्यासंबंधीचा 'वर्नाक्यूलर एज्यूकेशन ॲक्ट' 37 खालील प्रमाणे आहे.

जुदा जुदा विषयोने लगता भाषांतर करावावाना होवाथी क्यां क्यां पुस्तकोना भाषांतर करावावा ते नक्की करवा सारू विद्याधिकारीए पोताना प्रमुखपणा नीचे सरकार तरफथी नीमाएली समितिना सभासदोनी सलाह लेवी.

765 (1) (अ) भाषांतर समितिने भाषांतर करवा योग्य लागे तेवा पुस्तकोनी यादी विद्याधिकारीए आज्ञापत्रिका तथा बीजा देशी भाषाना वर्तमान पत्रोमां जरूर जणाय त्यारे अने तेवा अंतरे छपावीने भाषांतर करवा खुशी होय तेवी व्यक्तीओ पासे अरजीओ मंगाववी. पुस्तकोनी यादीमा 1) पुस्तकनुं नाम, 2) पृष्ठनी संख्या, 3) भाषा, 4) भाषांतर माटे आपवामां आवनार महेनताणुं तथा 5) भाषांतर तैयार करी आपवानी मुदत विगेरे विगतो आपवी.

(ब) मंगावेली अरजीमां अरजदारोए तेमनी लायकात, भाषा, विगेरे तथा भाषांतरकार पोते पोताने जोखमे भाषांतर छपाववा तैयार होय तो सरकार पासेथी केवा प्रकारना उत्तेजननी आशा राखे छे ते.

766 (2) सारा लेखको पासे भाषांतर करावावानुं योग्य जणाय त्यारे तेवा लेखकोनो सहकार मेळववा तेमने विनंती करवी. तेमनी पासेथी अरजी मंगाववानी जरूर नथी.

कलम 765 प्रमाणे अरजीओ आव्या पछी भाषांतर समितिए क्या क्या पुस्तकोनुं कई भाषामां भाषांतर करवानुं काम कोने कोने अने ते नक्की करवुं परंतु ए प्रमाणे नक्की करती वखते राज्यनी रैयत्नो मोटो भाग गुजराती भाषा बोलनारो छे तेमज जे ग्रंथोना भाषांतर थई गया होय तेना भाषांतर फरी थता नथी ते उपर ध्यान आपवुं.

767 भाषांतर करवा बदल आपवानुं महेनताणु पृष्ठवार के एकंदर पुस्तकदीठ अगाऊथी मुकरर करी कलम 765 मां जणावेली जाहिरात साथे भाषांतर समितिनी सलाह लई प्रसिद्ध करवा विद्याधिकारीने प्रतिबंध

नथी.

768 कलम 765 मां जणावेल पुस्तकोना नाम, ठाम, लायकी विगेरे ध्यानमां लई तथा महेनताणुं ठरावी भाषांतर करवानुं काम विद्याधिकारीए भाषांतर समितिनी सलाह लई योग्य ते शख्सने सोपवुं.

769 भाषांतर करवानुं काम सोपती वखते जे ते पुस्तकने अंगे वधारा घटाडा विगैरे संबंधी जे जे सूचनओ आपवानी होय तो ते तमाम विद्याधिकारीए भाषांतरकारने पूरी पाडवी अने भाषांतर तैयार थईने आवे त्यारे ते योग्य थयेलु छे के केम ते संबंधी तपास भाषांतर समितिनी सलाह अनुसार पोताना भाषांतर मदतनीस द्वारा के अन्य कोई विद्वानद्वारा योग्य पारितोषिक आपी करी लेवी. भाषांतर करनार कोई जाणीता विद्वान होय अने तेणे करेलुं भाषांतर तपासाववानी आवश्यकता भाषांतर समितिने न जणाय तो तपासवानी जरूर छे एम समजवुं नही.

770 प्रत्येक भाषांतरकारे पोतानी भाषांतरनी सुवाच्च फुलस्केप अडधीया के चोथीया कागळना एक बाजुए लखेली एक प्रत विद्याधिकारीने रजू करवी पडशे. अने विद्याधिकारी ते भाषांतर योग्य रीते थयुं के नही ते कलम 769 मां जणावेली रीते तपासी के तपासावी लेशे, अने जो तेनी तपासने अंते फेरफार करावता जेवु लागशे तो आवश्यक फेरफार जे ते भाषांतरकारनी पासे करावशे अने भाषांतरकारे ते फेरफार करी एक नवीन प्रत छापखानामां चाली शके तेवी करी आपवी पडशे.

771 कलम 770 प्रमाणे ज्यारे छापखानामां चाली शके तेवी भाषांतरकार तरफथी विद्याधिकारीने मळी जाय त्यारे विद्याधिकारीए भाषांतराकारने ठरावेली महेनताणानी रक्मना 4/5 नाणा आपवा अने बाकीनी 1/5 रकमना नाणा ते भाषांतर छपाय त्यारे तेना प्रुफ वंचाववाने माटे भाषांतरकारने नामे बाकी अनामत राखवा.

772 कलम 771 प्रमाणे 1/5 रकम बाकी रहे तेमांथी जे ते पुस्तकना भाषांतरकारनी पासे जे ते भाषांतरना प्रुफ वंचाववा अने ते बधा वंचाई रहे त्यारे तेने नामे बाकी रहेली रकम तेने आपवी. परंतु जो ते भाषांतर करनार हरकोई कारणथी पोताना भाषांतरनां प्रुफ वांची आपी न शके तो विद्याधिकारीए

बीजा कोई इसमनी पासे ते भाषांतरना प्रुफो वंचावी लेवा अने सदरहु 1/5 रकममांथी योग्य रकम एवा वांचनारने आपवी.

773 भाषांतर छपावी प्रसिद्ध करवानुं काम विद्याधिकारीए निबंधनी कलम 67मां जणाव्या प्रमाणे करवानुं छे अने तेमां जणाव्या प्रमाणे तेमनी पासे प्रत्येक भाषांतरनी छापेली 150 प्रतो आवशे. एटले ए प्रतोनी व्यवस्था तेमणे नीचे प्रमाणे करवी.

अ. दस प्रतो लेखकने

आ. दस प्रतो विविध देशी मासिको तथा वर्तमानपत्रोने अभिप्राय माटे.

इ. पंचोत्तेर प्रतो ग्राम्य पुस्तकालयोने मफत आपवा पुस्तकालय खाताने.

ई. चालीस प्रतो मोटा शहेरोनी देशी शाळाओने

उ. पंदर प्रतो भाषांतर शाखाने आपवी.

आ धोरणमां जुज जाज फेरफार करवा विद्याधिकारीने अधिकार छे.

774 जे पुस्तकोनी तमाम नकलो वेहेचाई जाय अने तेनी विद्याधिकारीने आवश्यकता जणाय तो तेमणे भाषांतर समितिनी सलाह मुजब तेवा पुस्तकनी बीजी आवृत्ति के कोई स्वतंत्र प्रकाशकनी पासे कढाववा तजवीज करवी.

775 जे कोई ग्रंथ सरकार पोते नही छापता बीजा कोई प्रकाशकने छापी प्रसिद्ध करवा पुरतो आपशे ते ग्रंथन प्रथमावृत्ति खपी जता सुधी तेनो प्रकाशकना तरीकेनो हक्क भोगवशे. एटले के सरकार तेनी बीजी आवृत्ति कढावशे नही.

776 कोई माणसे कोई सारा ग्रंथनुं भाषांतर पोतानी पसंदगीथी तैयार कर्युं होय अने ते माणस विद्याधिकारीने रजु करे तो विद्याधिकारीए ते भाषांतर योग्य पुस्तकनुं योग्य रीते थयु छे के नही तेनी तपास भाषांतर समितिनी सलाह अनुसार करवी अने तेवी तपासने अंते विद्याधिकारीने जो एम लागे के ते भाषांतर बधी रीते स्वीकार्य छे तो जो भाषांतरकार पोताथी ते पुस्तक छपावी प्रसिद्ध करावने खुशी होय तो

विद्याधिकारीए केवळ उत्तेजन खातर भाषांतरना नियमने अनुसरीने आकेली किंमते 150 सुधी प्रतो तेनी पासेथी खरीदवी अने जो भाषांतरकार पोते छापी प्रसिद्ध करवा खुशी न होय अने भाषांतर उपयोगी लागे तो विद्याधिकारीए भाषांतर समितिनी सलाह लई धोरण अनुसार योग्य महेतताणुं आपी भाषांतर उपरना तेना हक्क साथे खरीदी लेवुं अने पछी तेने प्रसिद्ध करवा तजवीज करवी.

777 महेनताणुं के उत्तेजन आपीने जे भाषांतर तैयार थशे ते तमामना छापेला पुस्तकोना मुखपृष्ठ उपर 'श्री सयाजी साहित्यमाला' के अन्य काई लखाण विद्याधिकारी भाषांतर समितिनी सलाह मुजब सूचवशे ते तेना प्रसिद्ध करनारने लखवुं पडशे अने ते उपरांत विद्याधिकारीनी सही वाळी जाहिरात पण एमा प्रसिद्ध करवी पडशे.

778 'श्री सयाजी साहित्यमाला'मां गणाता तमाम पुस्तकोने माटे कद, कागळ, पुठ्ठु, किंमत विगेरे संबंधी मंजुरी भाषांतरना प्रकाशके विद्याधिकारी पासेथी लेवी पडशे.

779 विद्याधिकारीए 'श्री सयाजी साहित्यमाला'नां पुस्तको माटे कद, कागळ, पुठ्ठु विगेरेनुं धोरण नक्की करवुं परंतु योग्य लागे त्यारे तेमां फेरफार करवाने विद्याधिकारीने प्रतिबंध नथी.''[41]

महाराष्ट्रातील प्रबोधनपरंपरेचा विचार करताना बहुंताशी वेळा पुणे व मुंबई येथील वैचारिक चळवळी, व्यक्ती व संस्था, यांच्या केंद्रवर्ती संदर्भात विचार केला जातो. भिन्न भिन्न प्रोदशिक संदर्भात भिन्न भिन्न वर्गीय पातळीवर अस्तित्वात असलेल्या मराठी भाषिक समाजात प्रबोधनाची प्रक्रिया घडत होती. तिची फारशी दखल घेतली जात नाही. महाराजांच्या सर्व प्रयत्नांनी मराठीसाठी बडोदे येथे एक साहित्यभारित शक्तिसारखे वातावरण त्यांनी निर्मित केले होते. 'सयाजी साहित्यमाले' मुळे मराठी वाङ्मयाची जी अभिवृद्धि झाली, ती तर स्वतंत्रपणे अभ्यासायला हवी अशा योग्यतेची आहे.

✪✪✪✪✪

## संदर्भ टीपा (प्रकरण-2)


1. कृ. भि. कुळकर्णी, आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांति, 1956, पृ.क्र. 18
2. कृ. भि. कुळकर्णी, आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांति, 1956, पृ.क्र. 20
3. कृ. भि. कुळकर्णी, आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांति, 1956, पृ.क्र. 22
4. गो. म. कुलकर्णी, आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (1680-1950), 1994, पृ.क्र. 49
5. कृ. भि. कुळकर्णी, आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांति, इ.स. 1956, पृ.क्र. 22
6. सं. म. गं. नातू, दि. य. देशपांडे, आगरकर वाङ्मय (खंड-1) 1984, 46-47
7. सदा कऱ्हाडे, मराठी साहित्याची सांस्कृतिक पार्श्वभूमि, 1990, पृ.क्र.
8. सं. वा. वि. साठे, निबंधमाला, 1926, पृ.क्र. 9
9. सं. वा. वि. साठे, निबंधमाला, 1926, पृ.क्र. 180
10. दा. ना. आपटे, श्री महाराज सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांचे चरित्र, खंड-2रा, 1936, पृ.क्र. 663
11. Government of His Highness The Maharaja Gaekwar of Baroda - Rules under the Vernacular Education Act XXXVII of 1931
12. सं. व. प्र. य. गो. जोशी, श्री मन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे (तृ.खं.) 1939, पृ.क्र. 9
13. सं. व. प्रका. य. गो. जोशी, श्री मन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे (तृ.खं.) 1939, पृ.क्र. 19
14. प्र. दामोदर सांवळाराम आणि मंडळी, श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे (द्वि. खं.), 1937, पृ.क्र. 21
15. Tippan No. - 34, dt. 6.5.1902, हुं. हुं. नं. A-30/4.4.1903

16. सं. व. प्र. य. गो. जोशी, श्री मन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे (तृ.खं.) 1939, पृ.क्र. 14, 15

17. दा. ना. आपटे, श्री महाराज सयाजीराव गायकवाड (तीसरे) यांचे चरित्र, खंड 2रा, इ.स. 1936, पृ.क्र. 668-69

18. सं. व प्र. य. गो. जोशी, श्री मन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे (तृ.खं.) 1939, पृ.क्र. 15

19. सं. व प्र. य. गो. जोशी, श्री मन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे (तृ.खं.) 1939, पृ.क्र. 45-46

20. सं. व प्र. दामोदर सांवळाराम आणि मंडळी, श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे, (द्वि. खं.), 1937, पृ.क्र. 218-219

21. सं. व प्र. दामोदर सांवळाराम आणि मंडळी, श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे, (द्वि. खं.), 1937, पृ.क्र. 171

22. भालचंद्र नेमाडे, टीकास्वयंवर, प्र.आ. 1990, पृ.क्र. 259-260

23. सं. व प्र. दामोदर सांवळाराम आणि मंडळी, श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे, (प्र. खं.), 1936, पृ.क्र. 172

24. सं. व प्र. दामोदर सांवळाराम आणि मंडळी, श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे, (प्र. खं.), 1936, पृ.क्र. 180-81

25. सं. व प्र. दामोदर सांवळाराम आणि मंडळी, श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे, (प्र. खं.), 1936, पृ.क्र. 182

26. दा. ना. आपटे, श्री महाराज सयाजीराव गायकवाड यांचे चरित्र, खंड-3रा, 1936, पृ.क्र. 887

27. दा. ना. आपटे, श्री महाराज सयाजीराव गायकवाड यांचे चरित्र, खंड-3रा, 1936, पृ.क्र. 887

28. दा. ना. आपटे, श्री महाराज सयाजीराव गायकवाड यांचे चरित्र, खंड-3रा, 1936, पृ.क्र. 887

29. दा. ना. आपटे, श्री महाराज सयाजीराव गायकवाड यांचे चरित्र, खंड-3रा, 1936, पृ.क्र. 887

30. सं. व प्र. दामोदर सांवळाराम आणि मंडळी, श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे, (द्वि. खं.), 1937, पृ.क्र. 181

31. सं. व प्र. दामोदर सांवळाराम आणि मंडळी, श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे, (द्वि. खं.), 1937, पृ.क्र. 180-81

32. सं. व प्र. दामोदर सांवळाराम आणि मंडळी, श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे, (द्वि. खं.), 1937, पृ.क्र. 218

33. सं. व प्र. य. गो. जोशी, श्री मन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे (तृ.खं.) 1939, पृ.क्र. 45-48

34. सं. व प्र. दामोदर सांवळाराम आणि मंडळी, श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे, (द्वि. खं.), 1937, पृ.क्र. 211

35. सं. व प्र. दामोदर सांवळाराम आणि मंडळी, श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे, (द्वि. खं.), 1937, पृ.क्र. 211-220

36. सं. व प्र. दामोदर सांवळाराम आणि मंडळी, श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे, (प्र. खं.), 1936, पृ.क्र. 218

37. सं. व प्र. दामोदर सांवळाराम आणि मंडळी, श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे, पृ.क्र. 218

38. सं. व प्र. दामोदर सांवळाराम आणि मंडळी, श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे, (द्वि. खं.), 1936

39. सं. व प्र. दामोदर सांवळाराम आणि मंडळी, श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे, (द्वि. खं.), 1937, पृ.क्र. 186-187

40. भरतराम भा. देसाई, रमणिकराय श्री. देसाई, वडोदरा राज्यनी साहित्य प्रवृत्तिओ, 1957, पृ.क्र. 1.2

41. Government of his highness the Maharaja Gaekwar of Baroda Rules under Vernacular Education Act XXXVII of 1931.